अमरावती-नागपूर-चंद्रपुर-वर्धा-यवतमाळ-अकोला-वाशिम-बुलढाणा-खामगांव

Postal Lic./AMT/RNP/492/2026-2028

वरुड | शुक्रवार
०२.१०.२०२६

# वरुड दर्पण

जनसामान्यांच्या मनातील आरसा

RNI REGD.NO.MAHMAR/2019/78235
chandubhad@gmail.com
www. waruddarpan.com
9422157712, 8669533485

वर्षः ०७ | अंकः २४३ | पृष्ठे: ०६ | किंमत: ०२

संपादक - चंद्रकांत भा. भड

+91 7745067712

## 'शेतकऱ्याच्या मागं तगादा लावायचा नाही'

### चंद्रशेखर बावनकुळेंचा राज्यातील बँकांना सूचना

■ (प्रतिनीधी वरुड दर्पण)



**मुंबई** – राज्यसरकारने २६५ तालुक्यांमध्ये दुष्काळ जाहीर केला असून सध्या दुष्काळी पंचनामे सुरू असून कुठल्याही शेतकऱ्याची शेतमजुराची अडवणूक होणार नाही याची काळजी घेण्याचे निर्देश महसूल मंत्री व दुष्काळ निवारण मंत्रिमंडळ उपसमितीचे अध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांनी दिले.

विशेषतः राष्ट्रीयकृत बँकेपासून डीसीसी बँक, पतसंस्था, प्रायवेट बँका कुठल्याच बँकेने शेतकऱ्याच्या मागे तगादा लावायचा नाही. या काळात सावकारांनी जर शेतकऱ्याला लुटलं तर सरकार त्याला सोडणार नाही असा इशाराच बावनकुळे यांनी दिला. दुष्काळी पंचनामे आणि सरसकट मदतीवरही ते बोलले आहेत. छत्रपती संभाजीनगरमध्ये ते बोलत होते.

'राज्यातील दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांना अचूक पंचनामे व्हावेत, कारण दुष्काळ तर जाहीर झाला आहे. २६५ तालुके आणि आज-उद्या काही तालुके जोडणार आहोत. पण सर्वांनी अचूक पंचनामे करण्याकरिता पुढाकार घ्यावा, कुठेही चूक होऊ नये, अशा सूचना मुख्यमंत्री महोदयांनी सर्वच मंत्र्यांना दिल्याचं महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी सांगितलं. मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी सांगितलं 'ग्रामविकास विभाग, कृषी विभाग आणि महसूल विभाग या तिन्ही विभागांमध्ये या ठिकाणी पंचनाम्यावर काम होणार आहे आणि लवकरच आपल्याला शेतकऱ्याला मदत करायची आहे, याकरिता आमचं सरकार काम करणार आहे. 'शेतकऱ्याच्या या दुष्काळी परिस्थितीमध्ये सोबतच पिण्याच्या पाण्याचं नियोजन महत्त्वाचं आहे, जनावरांच्या चाऱ्याचं नियोजन महत्त्वाचं आहे, पुढच्या काळामध्ये जलसंधारण... या ठिकाणी पिण्याच्या पाण्याचे जे काही आपल्याकडे साठे आहेत त्याला पुन्हा एकदा मजबूत करायचं आहे.

आणि मोठ्या प्रमाणावर या ठिकाणी शेतकरी-शेतमजूर त्याला कुठल्याही पद्धतीची अडवणूक होणार नाही याची काळजी घ्यायची आहे.' असेही बावनकुळे म्हणाले.

### आळंदीच्या विद्यार्थ्यांसाठी दिवेआगरची सहल ठरली काळी आठवण

## ८ मृतदेह रुग्णवाहिकेत ठेवताच पालकांना हुंदका अनावर

■ (प्रतिनीधी वरुड दर्पण)









**रायगड** – रायगडच्या दिवेआगर समुद्रकिनाऱ्यावर गुरुवारी आठ विद्यार्थ्यांचा समुद्रात बुडून मृत्यू झाला होता. पुण्यातील आळंदी येथील विनर्स अकॅडमीमधील अकरावी आणि बारावीचे विद्यार्थी आणि शिक्षक असे मिळून ४८ जण दिवेआगर याठिकाणी सहलीसाठी आले होते. मात्र, ही सहल या सर्वांसाठी आयुष्यातील एक कटू आठवण ठरली. दिवेआगर समुद्रकिनाऱ्यावर भरतीच्या पाण्याचा अंदाज न आल्याने या विद्यार्थ्यांपैकी आठ जणांचा बुडून मृत्यू झाला.

या सर्वांचे मृतदेह समुद्रातून बाहेर काढून त्यांचे शवविच्छेदन करण्यात आले. हे मृतदेह श्रीवर्धन जिल्हा उपरुग्णालयात ठेवण्यात आले होते. पहाटे ४ वाजेपर्यंत शवविच्छेदन प्रक्रिया पार पडल्यानंतर आठही मुलांचे मृतदेह शुक्रवारी पहाटे आळंदीच्या दिशेने रवाना करण्यात आले होते.

तत्पूर्वी काल रात्रीच सहलीसाठी आलेल्या विद्यार्थ्यांची बसही दिवेआगर येथून आळंदीच्या दिशेने निघाली. आनंदाचे चार क्षण व्यतीत करण्यासाठी याठिकाणी आलेले विद्यार्थी आणि शिक्षक काळ्या आठवणी घेऊन दिवेआगरमधून निघाले. ही बस शुक्रवारी पहाटे आळंदीत दाखल झाली. याठिकाणी अत्यंत शोकाकूल वातावरण आहे. विद्यार्थ्यांचे पालक आणि नातेवाईक एकमेकांच्या गळ्यात पडून रडताना दिसत आहेत.

ही दुर्घटना घडल्यानंतर काल रात्री महिला व बालविकास मंत्री अदिती तटकरे श्रीवर्धनमध्ये गेल्या होत्या. त्यांनी मृत मुलांच्या पालकांची आणि नातेवाईकांची भेट घेऊन त्यांचे सांत्वन केले. या दुर्घटनेबद्दल अदिती तटकरे यांनी शोक व्यक्त केला. दिवेआगर हा सुरक्षित समुद्रकिनारा आहे. याठिकाणी अशी दुर्घटना घडणे दुर्दैवी असल्याचे त्यांनी म्हटले. निसर्ग आणि त्याच्या मर्यादांचे पालन करणे गरजेचे आहे. मृतांच्या कुटुंबासोबत संपूर्ण सरकार पाठीशी असल्याचे अदिती तटकरे यांनी म्हटले.

### थोडक्यात

## मिठी नदी गैरव्यवहार प्रकरणी अभिनेता डिनो मोरियाला अटक



■ (प्रतिनीधी वरुड दर्पण)

**मुंबई** – मिठी नदीतील गाळ उपसा आणि सफाईच्या कामातील आर्थिक गैरव्यवहारप्रकरणी अभिनेता डिनो मोरिया याला मुंबई पोलिसांच्या आर्थिक गुन्हे शाखेने शुक्रवारी अटक केली. या प्रकरणाच्या तपासात मोरियाचे आर्थिक व्यवहार आणि या प्रकरणातील प्रमुख आरोपी केतन कदम याच्याशी असलेले आर्थिक संबंध तपास यंत्रणांच्या रडारवर आले होते. मिठी नदीतील गाळ उपशाच्या कामांमध्ये सुमारे ६५ कोटी रुपयांचा गैरव्यवहार झाल्याचा आरोप आहे.

### समृद्धी महामार्गावर भीषण अपघात : नवरात्रौत्सवासाठी

## दुर्गादेवीची मूर्ती आणायला गेलेल्या तरुणांवर काळाचा घाला, ७ जणांचा मृत्यू, १८ जखमी

■ (प्रतिनीधी वरुड दर्पण)



**अमरावती** – जिल्ह्याच्या धामणगावमधून एक मोठी बातमी समोर आली आहे. समृद्धी महामार्गावर भीषण अपघाताची घटना घडली आहे. नवरात्रौत्सवासाठी दुर्गादेवीची मूर्ती आणायला गेलेल्या तरुणांवर काळानं झडप घातली आहे. या दुर्दैवी अपघातात सात जणांचा मृत्यू झाल्याची माहिती आहे. तर बारा जण जखमी झाल्याचं कळतंय. रात्री एकच्या सुमारास हा अपघात झालाय. रोडवर मूर्तीसह तरुण कार्यकर्ते चालत असताना दुसऱ्या वाहनाने धडक दिली असल्याची माहिती आहे. नवरात्रौत्सवाच्या तोंडावर घडलेल्या या दुर्दैवी घटनेनं वर्धा हादरलं असून परिसरात हळहळ व्यक्त केली जात आहे.

नवरात्रौत्सवासाठी दुर्गादेवीची मूर्ती आणायला गेलेल्या तरुणांवर काळाचा घाला, अमरावती जिल्ह्याच्या धामणगाव पोलीस स्टेशन हद्दीत असलेल्या समृद्धी महामार्गावर टाटाएस गाडीचा भीषण अपघात झालाय. शेगाव येथून दुर्गा देवीची उंच मूर्ती नवरात्रौत्सवासाठी आणली जात असताना दुर्गा माता मंडळातील तरुण सदस्यांचा हा भीषण अपघात झालाय. या अपघातात बारा जण गंभीर जखमी झाले असून सात जणांचा यात दुर्दैवी मृत्यू झाला असल्याची घटना घडली आहे. मध्यरात्री एक वाजताच्या सुमारात ही घटना घडल्याच्या प्राथमिक माहिती आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, वर्ध्याच्या सिंदी मेघे परिसरात राहणारे सर्व असून जखमींना वर्ध्याच्या सावंगी रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. यात बारा गंभीर जखमी, तर पाच किरकोळ जखमी झाल्याची माहिती आहे. दरवर्षी सिंदी मेघे येथील दुर्गा माता मंडळाचे सदस्य देवीची मूर्ती शेगाव येथून आणतात. शेगाव येथून समृद्धी महामर्गाने मूर्ती घेऊन परत येत असताना हा अपघात घडला आहे. या घटनेनं सिंदी मेघे परिसरात शोक पसरला असून मंडळातील सदस्यांचा असा दुर्दैवी मृत्यू झाल्याने हळहळ व्यक्त होत आहे.

## अंगावर विषारी केमिकल उडाल्याने कामगाराचा मृत्यू

### मलकापूर औद्योगिक क्षेत्रातील बॅन्जो केम कंपनीतील धक्कादायक घटना

■ (प्रतिनिधी वरुड दर्पण)





**बुलढाणा** – जिल्ह्यातील मलकापूर येथील औद्योगिक क्षेत्र परिसरातील बॅन्जो केम प्रायव्हेट लिमिटेड या कंपनीतील एका कामगाराच्या अंगावर विषारी केमिकल उडाल्याने गंभीर झालेल्या कामगाराचा उपचारादरम्यान मृत्यू झालाय. या धक्कादायक घटनेने परिसरात खळबळ उडाली आहे. तसेच या घटनेमुळे बेंजो केम कंपनीच्या कामगारासंबंधी भूमिकेवर प्रश्नचिन्ह देखीक निर्माण झाल आहे. गुरुवारी दुपारी बँजो केम कंपनीत ललित वाघ नावाच्या कामगाराच्या अंगावर व चेहऱ्यावर काम करत असताना विषारी केमिकल उडाल्याने त्याची प्रकृती बिघडली होती. त्याला तात्काळ मलकापूर येथील एका खाजगी रुग्णालयात दाखल करण्यात आलं असता त्याचा उपचारादरम्यान मृत्यू झाला. या घटनेमुळे आधीच चर्चेत राहणाऱ्या बॅन्जो केम या कंपनीच्या कामगार सुरक्षा बद्दल निष्काळजीपणा समोर आला आहे. आदिलाबादकडून नागपूरकडे भरधाव वेगाने जाणाऱ्या एका कंटेनरने रस्त्यावरून जाणाऱ्या नागरिकाला चिरडल्याची दुर्घटना यवतमाळच्या पांढरकवडा तालुक्यातील केळापूर परिसरात घडली.

## नागपुरात मध्यरात्री हवेत गोळीबार, नंदनवन परिसर गोळीबाराच्या आवाजाने हादरलं : कुख्यात गुंडाला अटक; दोन महिन्यांत तिसरी घटना

■ (प्रतिनीधी वरुड दर्पण)





**नागपूर** – नागपूरच्या नंदनवन पोलीस ठाण्याच्या हद्दीतील हसनबाग परिसरात हवेत गोळीबार करत दहशत निर्माण करण्याचा प्रयत्न करणाऱ्या आरोपीला अटक करण्यात पोलिसांना यश आले आहे.

गुरुवारी मध्यरात्री झालेल्या गोळीबाराच्या आवाजाने नंदनवन परिसरात एकच खळबळ उडाली होती. या घटनेनंतर तात्काळ पोलिसांनी घटनास्थळ गाठत तपास सुरु केला असता या प्रकरणी पोलिसांनी आरोपी रोशन गायकवाड ऊर्फ गोट्या याला वणी येथून अटक केली आहे.

पोलिसांनी आरोपीचा अधिक तपास केला असता आरोपीविरुद्ध पूर्वीचे नऊ गुन्हे दाखल असल्याची माहिती तपासातून पुढे आली आहे. दरम्यान, नंदनवन पोलिसांनी कारचा नंबर शोधून काढत चालका विरुद्ध गुन्हा दाखल केला आहे.



# सातारा पोलिसांकडून कासव तस्करीचा पर्दाफाश : २ अल्पवयीन मुलांसह चौघांना अटक, इंडीयन सॉफटसेल टर्टल जप्त

(प्रतिनिधी वरुड दर्पण)

**सातारा** – कासवाची तस्करी करणाऱ्या चौघांच्या टोळीचा सातारा तालुका पोलिसांनी पर्दाफाश करत चौघांवर गुन्हा दाखल केला.

संशयितांमध्ये दोघेजण अल्पवयीन असून ५० हजार रुपये किंमतीचे कासव देखील पोलिसांनी ताब्यात घेतले आहेत. प्रज्वल विजय सावंत (वय २१, रा.खोकडवाडी ता. सातारा) व केतन विनोद जाधव (वय २१, रा. गोवे ता. सातारा) अशी अटक केलेल्या दोघांची नावे आहेत. पोलिसांनी अल्पवयीन दोघांना ताब्यात घेतले आहे. दुसऱ्या घटनेत सातारा पोलिसांनी तब्बल ४,८४२ मोबाईल हस्तगत करून नागरिकांना परत मिळवून दिले आहेत.




सातारा तालुका पोलीस ठाण्याच्या हद्दीमध्ये वन्य प्राण्यांची तस्करी व विक्री होत असल्याची माहिती पोलिसांना मिळाली होती. गुन्हे प्रकटीकरण शाखेचे (डीबी) पोलिस त्यानुसार माहिती घेत होते. सातारा तालुक्यातील लिबखिंड परिसरामध्ये चौघेजण तस्करी केलेल्या कासवाची विक्री करण्यास येणार असल्याची माहिती पोलिसांना मिळाली. त्यानुसार पोलिसांनी पथक तयार करून गस्त घातली. पोलिसांनी लिंबखिंड येथे चौघेजण संशयास्पद थांबलेल्यांकडे चौकशी केली. त्यावेळी त्यांच्याकडून ५० हजार रुपये किंमतीचे इंडीयन सॉफटसेल टर्टल जातीचे कासव व दोन मोटर सायकल असा मुद्देमाल जप्त करण्यात आला. संशयितांनी ते कासव कुठून आणले? कोणास विक्री करणार आहे? याबाबत तपास सुरु केला आहे. याप्रकरणी पोलीस निरीक्षक निलेश तांबे यांच्या मार्गदर्शनाखाली सपोनि सुदर्शन काटकर, चंद्रहार पाटील, फौजदार अभिजीत गुरव, पोलीस राजु शिखरे, मनोज गायकवाड, यांनी कारवाईत सहभाग घेतला. सातारा जिल्हा पोलीस दल आणि सायबर पोलीस ठाण्याने केंद्र सरकारच्या 'उएखठ' पोर्टलचा प्रभावी वापर करत गहाळ झालेले आणि चोरीस गेलेले मोबाईल शोधण्याची विशेष मोहीम यशस्वीरीत्या राबवली आहे.

### नागपूर येथे आयुर्वेद व पंचगव्य चिकित्सा केंद्राचे उदघाटन

# पंचगव्य, कृषी आणि आयुर्वेद जनजागृतीचा संकल्प

(प्रतिनीधी वरुड दर्पण)

**नागपुर** – प.पू.सद्गुरु श्री आनंदनाथ महाराज सांगवडेकर कोल्हापूर आणि गुरुवर्य वैद्यराज समीरजी जमदग्नी पुणे यांच्या मार्गदर्शन व गोमातेच्या आशीर्वादाने गो विज्ञान अनुसंधान केंद्र, देवलापार व श्री विश्वकृपा आयुर्वेदालय वरुड यांच्या संयुक्त विद्यमाने आयुर्वेद व पंचगव्य चिकित्सा केंद्राचे उदघाटन नागपूर येथे मोठ्या उत्साहात संपन्न झाले.

या सोहळ्यास गो विज्ञान अनुसंधान केंद्राचे अध्यक्ष पदमेश गुप्ता तर उदघाटक म्हणुन डॉ.मनिषा कोठेकर, कार्याध्यक्ष डॉ.हेमंत जांभेकर, सचिव सनतकुमार गुप्ता, श्री विश्वकृपा आयुर्वेदालय किसना पं.सोनारे, डॉ.नंदिर्नी भोजराज, अश्विनी जिचकार, किशोर कुबडे आदी उपस्थित होते.





प्रमुख उदघाटक डॉ.मनिषा कोठेकर यांनी 'पंचगव्य चिकित्सा ही केवळ उपचार पद्धती नसून ती भारतीय कृषी संस्कृतीचा पाया आहे. पंचगव्य, कृषी आणि आयुर्वेद हे तिन्ही एकमेकांवर अवलंबुन आहेत. गाईवर आधारित विषमुक्त शेतीतूनच सकस अन्न मिळते आणि सकस अन्नातूनच निरोगी शरीर बनते.

नागपूर सारख्या शहरात डॉ.चरण सोनारे यांनी सुरु केलेले हे केंद्र, यकृत रोगांवर जे कार्य करत आहे, ते निश्चितच समाजोपयोगी ठरेल. यावेळी इतर मान्यवरांनीही गो-आधारित अर्थव्यवस्था आणि आरोग्य यावर विचार मांडले. प्रास्तविक सनतकुमार गुप्ता तर आभार किसना सोनारे यांनी केले.

### व्यापारी आणि प्रशासन एकमेकांना पूरक

# संवादातून वरुडचा विकास होईल : अध्यक्ष धर्मेश जोशी

(प्रतिनीधी वरुड दर्पण)

**वरुड** – वरुड व्यापारी संघाचे नवनिर्वाचित अध्यक्ष धर्मेश जोशी आणि कार्यकारिणीचा पदग्रहण समारंभ नुकताच गोमती जिनिंग इंडस्ट्रीज येथे आयोजित करण्यात आला. या समारंभाला व्यापारी, मान्यवर नागरिक आणि प्रशासकीय अधिकारी कुटुंबियांसह उपस्थित होते.

अध्यक्ष धर्मेश जोशी यांनी कार्यकारिणीची घोषणा केली. यामध्ये रमेश हुकुम व प्रवीण डाफे उपाध्यक्ष, राजीव गावंडे सचिव, राहुल पटेल सहसचिव, जगदीश उपाध्याय कोषाध्यक्ष आणि यशपाल जैन यांची प्रसिद्धीप्रमुखपदी नियुक्ती करण्यात आली.




यावेळी बोलतांना धर्मेश जोशी म्हणाले की, जीएसटी, यूपीआय, आयकर आणि इतर प्रशासकीय प्रक्रियांमुळे व्यापाऱ्यांना अनेक आव्हानांना सामोरे जावे लागत आहे. मोठ्या व्यापाऱ्यांकडे तज्ज्ञांची सुविधा असते; मात्र छोट्या व्यापाऱ्यांसाठी हे नियम समजून घेणे आणि त्यांचे पालन करणे कठीण असते. यावेळी सुभाष ठाकरे यांचा शाल आणि श्रीफळ देऊन सत्कार केला.

यावेळी माजी अध्यक्ष गिरीधर देशमुख यांचा वाढदिवस साजरा करण्यात आला. विदर्भ साहित्य संघ नागपूर यांच्या वतीने मिळालेल्या अनिल कुमार पत्रकारिता पुरस्काराबद्दलही त्यांचा सत्कार करण्यात आला. समारंभाला नागपूरहून आलेले सहाय्यक आयुक्त (सेवानिवृत्त) प्रकाश त्रिवेदी आणि फायर निगेट सॉल्यूशनचे रजत तालुकदार विशेषतः उपस्थित होते.

या प्रसंगी निळकंठ यावलकर, श्याम खंडेलवाल, रितेश शाह, कन्नू पटेल, दिनेश खंडेलवाल, वामन जोशी, वीरेंद्र देशमुख, जेठानंद बाशाणी, कल्याण कोटेचा, रमेश यावले, नरेश घोड़साडे, पराग पनपालिया, कान्हा खंडेलवाल आणि शीतल पटेल यांच्यासह अनेक व्यापारी उपस्थित होते. मान्यवर नागरिकांमध्ये डॉ.सागर पावडे, अमित जयस्वाल, डॉ.राहुल भुतडा, डॉ.ओमप्रकाश मेंघाणी आणि आंचल यावलकर यांच्यासह व्यापारी संघाचे सदस्य कुटुंबियांसह सहभागी झाले.

संचालन रितेश शाह तर आभार आंचल यावलकर यांनी मानले. समारंभाच्या शेवटी व्यापारी आणि त्यांच्या कुटुंबियांनी नवनिर्वाचित अध्यक्ष व कार्यकारिणीला शुभेच्छा दिल्या. कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी सहकार्य करणारे भुपेंद्र घोड़साडे, जयंत गाडगिल आणि अश्विन घोड़सडे यांचे विशेष आभार मानण्यात आले.

### एन.टी.आर.हायस्कूलचा विद्यार्थी

# स्वरीतची धावण्याच्या स्पर्धेत चमकदार कामगिरी

(प्रतिनीधी वरुड दर्पण)

**वरुड** – नवयुवक शिक्षण संस्था द्वारा संचालित एन.टी.आर.हायस्कूलमधील इयत्ता ११ वीचा विद्यार्थी स्वरीत प्रशांत मालपे याने १७ वर्षांखालील मुलांच्या ४०० मीटर धावण्याच्या स्पर्धेत चमकदार कामगिरी करत तालुकास्तरावर प्रथम क्रमांक पटकाविला आहे. त्याने ही शर्यत अवघ्या ५८.७३ सेकंदात पूर्ण करुन हे यश संपादन केले आहे. या घवघवीत यशामुळे त्याची जिल्हास्तरीय क्रीडा स्पर्धेसाठी निवड झाली आहे.



त्याच्या या उत्कृष्ट कामगिरी व जिल्हास्तरावर निवड झाल्याबद्दल नवयुवक शिक्षण संस्थेचे सर्व पदाधिकारी, मुख्याध्यापक योगेश बरडिया, पर्यवेक्षक शशांक पाचघरे, क्रीडा शिक्षक, सर्व शिक्षक-शिक्षकेत्तर कर्मचारी, पालक व विद्यार्थ्यांनी त्याचे भरभरुन कौतुक केले आहे.

स्वरीतच्या या यशामुळे एन.टी.आर.हायस्कूल व नवयुवक शिक्षण संस्थेच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला गेला असून परिसरातून त्याच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

# पार्थ पवार आरोपी का नाहीत?

(प्रतिनिधी वरुड दर्पण)

**मुंबई** – पुण्याच्या मुंढवा येथील बहुचर्चित शासकीय जमिनीची खरेदी ज्या कंपनीने अल्प दरामध्ये केली त्या कंपनीत ९९ टक्के हिस्सा असणारे खासदार पार्थ पवार या व्यवहाराचे लाभार्थी ठरले नाहीत का? असा खडा सवाल गुरुवारी मुंबई उच्च न्यायालयाने महाराष्ट्र सरकारला केला.



तसेच या प्रकरणात ज्या व्यक्तीचा कंपनीत फक्त १ टक्के हिस्सा आहे, त्याला सहआरोपी बनवण्यात आले आहे; परंतु ज्या व्यक्तीकडे तब्बल ९९ टक्के शेअर्स आहेत, त्या पार्थ पवारांच्या भूमिकेबाबत तपास यंत्रणा मूग गिळून गप्प का आहे, असा निरीक्षणात्मक सवाल न्या.माधव जामदार यांच्या एकल पीठाने सुनावणीदरम्यान उपस्थित केला.

# माहितीचा अधिकार हा लोकशाहीचा प्राणवायु

### प्रा.सुधिर बानुबाकोडे यांचे प्रतिपादन

(प्रतिनीधी वरुड दर्पण)

**शेंदुरजनाघाट** – डॉ.श्यामाप्रसाद मुखर्जी कला महाविद्यालय येथे आंतरराष्ट्रीय माहिती अधिकार दिनानिमित्त 'लोकशाही व्यवस्थेतील माहिती अधिकाराचे अधिकाराचे महत्त्व' या विषयावर विशेष कार्यक्रम उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाला.

कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ.रा.ना.फुलारी तर प्रमुख वक्ते म्हणुन प्रा.सुधीर बानुबाकोडे यांनी मार्गदर्शन केले. प्रमुख अतिथी प्रा.डॉ.लुंबिनी गणवीर व प्रा.डॉ.दिनेश खेरडे उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक व संचालन प्रा.डॉ.प्रशांत चर्जन यांनी केले. त्यांनी माहिती अधिकाराची संकल्पना त्याची आवश्यकता तसे लोकशाही व्यवस्थेत नागरिकांना माहिती मिळण्याचे महत्त्व स्पष्ट केले. पारदर्शक प्रशासन आणि नागरिकांचा सक्रिय सहभाग यासाठी माहिती अधिकाऱ्याची भूमिका महत्त्वपूर्ण असल्याची त्यांनी सांगितले.



प्रमुख वक्ते प्रा.सुधीर बानूबाकोडे यांनी लोकशाही व्यवस्थेतील माहिती अधिकाराचे महत्व या विषयावर सविस्तर मार्गदर्शन केले.

प्राचार्य डॉ.रा.ना.फुलारी यांनी अधिकारायाचे महत्व विशद केले. नागरिकांनी आपल्या अधिकारांची जाणीव ठेवून माहिती अधिकाराचा योग्य आणि जबाबदारीने वापर करावा. असेही त्यांनी सांगितले. कार्यक्रमास मोठ्या संख्येने महाविद्यालयातील विद्यार्थी उपस्थित होते. उपस्थितांचे आभार प्रा.डॉ.लुम्बिनी गणवीर यांनी केले.

### सर्वोच्च न्यायालयाचा वाहनचालकांना इशारा

(प्रतिनीधी वरुड दर्पण)

**नवी दिल्ली** – वाहतूक नियमांचे उल्लंघन करणाऱ्या आणि वेळेवर दंड न भरणाऱ्या वाहनचालकांसाठी सर्वोच्च न्यायालयाने एक अत्यंत कठोर निर्णय घेतला आहे.

देशात सुमारे २३,००० कोटी रुपयांहून अधिक (एकूण ४९,१९४ कोटींपैकी २६,१७५ कोटी वसूल झाले असून उर्वरित रक्कम प्रलंबित) वाहतूक दंड थकीत असल्याच्या मुद्द्याची गंभीर दखल घेत सर्वोच्च न्यायालयाने सर्व राज्ये आणि केंद्रशासित प्रदेशांना कठोर कारवाई करण्याचे आदेश दिले आहेत. २८ सप्टेंबर रोजी एस. राजशेखरन विरुद्ध भारत सरकार या रस्ता सुरक्षा प्रकरणाच्या सुनावणीदरम्यान न्यायालयाने हे आदेश दिले आहेत.

# राष्ट्रीय सेवा योजना स्थापना दिन उत्साहात साजरा

### 'नशामुक्त भारत, व्यसनमुक्त युवा' विषयावर विद्यार्थ्यांचे प्रभावी सादरीकरण

(प्रतिनिधी वरुड दर्पण)

**लोणी** – येथील कला, वाणिज्य व व्यावसायिक अभ्यासक्रम कनिष्ठ महाविद्यालय व माध्यमिक विद्यालयात राष्ट्रीय सेवा योजना स्थापना दिन उत्साहपूर्ण वातावरणात नुकताच साजरा करण्यात आला.

विद्यार्थ्यांमध्ये सामाजिक बांधिलकी, राष्ट्रसेवेची भावना, नेतृत्वगुण आणि व्यक्तिमत्त्व विकासाचे संस्कार रुजविण्याच्या उद्देशाने आयोजित या कार्यक्रमात विविध उपक्रमांद्वारे समाजप्रबोधनाचा संदेश देण्यात आला. अध्यक्षस्थानी प्राचार्या एस.एम.दुर्योधन तर प्रमुख वक्ते म्हणून एन.एस.वडनेरकर यांनी विद्यार्थ्यांना राष्ट्रीय सेवा योजनेचे महत्त्व पटवुन दिले. यावेळी एन.व्ही.वडनेरकर, पी.डी.ब्राह्मणे, आर.डी.सोळंके, एस.डी.वंजारी, के.आर.नेरकर आणि एल.व्ही.चिंचे प्रमुख पाहुणे म्हणुन उपस्थित होते. कार्यक्रमाची सुरुवात मान्यवरांच्या हस्ते राष्ट्रपिता महात्मा गांधी आणि क्रांतिसूर्य महात्मा ज्योतिबा फुले यांच्या प्रतिमांचे पूजन करुन करण्यात आली. त्यानंतर झालेल्या मार्गदर्शनपर सत्रात मान्यवरांनी राष्ट्रीय सेवा योजनेच्या माध्यमातून विद्यार्थ्यांमध्ये श्रमप्रतिष्ठा, सहकार्याची भावना, सामाजिक उत्तरदायित्व आणि नेतृत्वगुण विकसित होतात, असे सांगितले. विद्यार्थ्यांनी शिक्षणासोबत समाजसेवेचे व्रत स्वीकारुन राष्ट्राच्या प्रगतीत सक्रिय योगदान द्यावे, असे आवाहनही त्यांनी केले.



कार्यक्रमाचे संचालन डी.एम.सावंत तर आभार एम.आर.भालेकर यांनी मानले. राष्ट्रीय सेवा योजनेचे गीत गाऊन कार्यक्रमाची सांगता करण्यात आली. याप्रसंगी कनिष्ठ महाविद्यालय व माध्यमिक विद्यालयातील शिक्षक, प्राध्यापक, शिक्षकेत्तर कर्मचारी तसेच मोठ्या संख्येने विद्यार्थी उपस्थित होते.

# संपादकीय

## आपले ध्येय ठरवा, आणि त्यासाठी मेहनत करा.

### दुष्काळाच्या सावटाखाली शेतकऱ्यांचा आक्रोश

पावसाचे दिवस सरत असताना आकाशाकडे लागलेले शेतकऱ्यांचे डोळे अजूनही पावसाच्या प्रतीक्षेत आहेत. पावसाची अनिश्चितता, लांबलेले खंड, पिकांची झालेली हानी आणि वाढता उत्पादन खर्च यामुळे ग्रामीण अर्थव्यवस्थेवर पुन्हा एकदा संकटाचे सावट निर्माण झाले आहे. दुष्काळ हा केवळ पाण्याचा प्रश्न नसून तो शेती, पशुधन, रोजगार, बाजारपेठ आणि संपूर्ण ग्रामीण जीवनव्यवस्थेला हादरा देणारे संकट आहे. शेतकऱ्याने मोठ्या अपेक्षेने खरीप हंगामाची तयारी केली. बियाणे, खते, औषधे, मजुरी आणि मशागतीवर मोठा खर्च केला. मात्र पावसाने साथ दिली नाही तर या सर्व खर्चाचे गणित काही दिवसांतच कोलमडते. पिके उभी असली तरी त्यांना आवश्यक पाणी मिळत नसेल, तर उत्पादनात मोठी घट होण्याची शक्यता निर्माण होते. कापूस, सोयाबीन, तूर, संत्री यांसारख्या पिकांवर अवलंबून असलेल्या शेतकऱ्यांसाठी ही परिस्थिती विशेष चिंताजनक आहे. दुष्काळाची तीव्रता केवळ पावसाच्या आकडेवारीवर ठरवता येत नाही. एखाद्या भागात सरासरी पाऊस झाला तरी त्याचे वितरण असमान असेल, पिकांच्या महत्त्वाच्या अवस्थेत पाऊस नसेल किंवा जलसाठे रिकामे होत असतील तर त्या भागातील शेतकऱ्यांना प्रत्यक्षात दुष्काळाची झळ बसू शकते. त्यामुळे दुष्काळाचे मूल्यांकन करताना पर्जन्यमानाबरोबरच जमिनीतील ओलावा, पिकांची अवस्था, भूजलपातळी, जलसाठे आणि उपलब्ध सिंचन यांचाही विचार करणे आवश्यक आहे. दुष्काळाच्या काळात सर्वात मोठा प्रश्न निर्माण होतो तो पिण्याच्या पाण्याचा. गावागावांत विहिरी, बोअरवेल आणि लहान जलस्रोत आटू लागले की नागरिकांना टँकरवर अवलंबून राहावे लागते. महिलांना आणि मुलांना पाण्यासाठी दूरवर जावे लागणे ही केवळ प्रशासनाची आकडेवारी नसून ग्रामीण जीवनातील कठोर वस्तुस्थिती आहे. पशुधनासाठी पाणी आणि चारा उपलब्ध करून देण्याचे आव्हानही त्याच वेळी उभे राहते.

✻ जन्मदिन विशेष

# युवा संघर्षयोद्धा : किरणदादा सावरकर

वरुड शहराच्या समाजकारणात एखाद्या व्यक्तीची ओळख पदामुळे नव्हे, तर जनसामान्यांच्या सुख-दुःखाशी असलेल्या जिव्हाळ्याच्या नात्यामुळे निर्माण होते. अशा मोजक्या व्यक्तिमत्त्वांमध्ये आज अगदी हक्काने घेतले जाणारे नाव म्हणजे किरणदादा सावरकर.

अगदी होश सांभाळल्यापासूनच समाजकारणाची ओढ मनात घेऊन वाटचाल करणाऱ्या किरणदादांनी आपल्या आयुष्यातील संघर्षाला कधीही आपल्या ध्येयाच्या आड येऊ दिले नाही. घरची परिस्थिती प्रतिकूल असतानाही स्वतःच्या दुःखाला मनाच्या एका कोपऱ्यात ठेवून दुसऱ्याच्या डोळ्यातील अश्रू पुसण्यासाठी धावून जाणारा हा युवक वरुडच्या सामाजिक जीवनात हळूहळू एक विश्वासाचा चेहरा बनत गेला.

एखाद्या सामान्य माणसाची समस्या असो, एखाद्या कुटुंबाची अडचण असो किंवा एखाद्या गरजू व्यक्तीची हाक असो, किरणदादांसाठी ती केवळ दुसऱ्याची समस्या कधीच नव्हती. ती स्वतःचीच समस्या आहे, या भावनेतून तिचे निराकरण करण्यासाठी धाव घेणे, हा त्यांच्या स्वभावाचा भाग बनला. त्यामुळेच त्यांच्या भोवती निर्माण झालेला जनसंपर्क हा केवळ राजकीय नव्हता, तर तो माणुसकीच्या नात्याने जोडलेला होता.



समाजकारणातून पुढे राजकारणात प्रवेश करताना त्यांनी आपल्या विचारांची दिशा स्पष्ट ठेवली. हिंदुत्ववादी विचारसरणी आणि छत्रपती शिवाजी महाराजांप्रती असलेली नितांत श्रद्धा मनात ठेवून ते भारतीय जनता पक्षाच्या विचारपरिवाराशी जोडले गेले. मात्र राजकारणात प्रवेश करणे आणि राजकीय स्थान निर्माण करणे या दोन वेगळ्या गोष्टी होत्या. त्यांच्यासमोरचा मार्ग अजिबात सोपा नव्हता.

परिस्थिती साधारण असल्यामुळे अनेकांनी त्यांची खिल्ली उडवली. कधी झेंडे बांधणारा, कधी सतरंज्या उचलणारा म्हणून त्यांना हिणवण्यात आले. काहींनी त्यांच्या क्षमतेवर प्रश्नचिन्ह उपस्थित केले, तर काहींनी त्यांच्या राजकीय भवितव्याची थट्टा केली. पण ज्याने आयुष्याच्या सुरुवातीपासूनच संघर्ष अनुभवला होता, त्या किरणदादांसाठी ही टीका नवी नव्हती.

त्यांनी उत्तर दिले ते शब्दांनी नव्हे, तर आपल्या कृतीने. टीका होत राहिली, उपहास होत राहिला, अडथळे येत राहिले, पण किरणदादांचा जनसेवेचा प्रवास थांबला नाही. उलट प्रत्येक टोमणा त्यांच्या संघर्षाची ताकद बनत गेला. लोकांच्या समस्या सोडवताना त्यांनी स्वतःची राजकीय उंची किती आहे याचा विचार केला नाही. त्यांच्यासाठी महत्त्वाचे होते ते समोर उभे असलेले माणूस आणि त्याची अडचण. आणि अखेर तो ऐतिहासिक क्षण आला. नगरसेवक पदाच्या निवडणुकीत माजी नगराध्यक्षांच्या पतीविरुद्ध निवडणुकीच्या मैदानात उतरलेल्या किरणदादांनी प्रचंड बहुमताने विजय मिळवला. हा विजय केवळ एका निवडणुकीचा निकाल नव्हता. हा अनेक वर्षांच्या संघर्षाचा, जनसंपर्काचा आणि सामान्य माणसाच्या विश्वासाचा विजय होता.

निवडणुकीपूर्वीही त्यांचा आत्मविश्वास खचवण्याचे प्रयत्न झाले. आर्थिक ताकद, राजकीय समीकरणे आणि प्रस्थापित शक्तीसमोर एक सामान्य घरातील युवक किती टिकणार, असा प्रश्न उपस्थित करण्यात आला. मात्र माननीय आमदार उमेश उर्फ चंदुभाऊ यावलकर यांच्या नेतृत्वावर आणि विश्वासावर विश्वास ठेवत किरणदादांनी ही लढाई लढली आणि इतिहास घडवला.

या विजयाने एक महत्त्वाचा संदेश दिला, तो म्हणजे राजकारणात केवळ धनशक्तीच निर्णायक नसते. जनतेशी असलेले नाते, कार्यकर्त्यांशी असलेली बांधिलकी आणि सामान्य माणसाच्या मनात निर्माण झालेला विश्वास हीस-द्धा मोठी राजकीय शक्ती असते. नगरसेवक म्हणून निवडून आल्यानंतरही किरणदादांची वाटचाल थांबली नाही. उलट जबाबदारी वाढली आणि त्यांच्यावरचा जनतेचा विश्वासही वाढत गेला. पुढे नगर परिषद वरुडच्या इतिहासातील सर्वात मोठ्या गटाचे गटनेते म्हणून त्यांची निवड झाली. आज भारतीय जनता पक्ष आणि सहयोगी पक्षांच्या २५ नगरसेवकांच्या मोठ्या गटाचे यशस्वी गटनेते म्हणून ते आपली जबाबदारी पार पाडत आहेत.

झेंडे बांधणाऱ्या आणि सतरंज्या उचलणाऱ्या कार्यकर्त्याची हेटाळणी करणाऱ्या लोकांना त्याच संघर्षातून उभ्या राहिलेल्या नेतृत्वाने उत्तर दिले आहे. मात्र किरणदादांच्या प्रवासाचे खरे वैशिष्ट्य इथेच आहे की, पद मिळाल्यानंतरही त्यांच्या पायाखालची जमीन बदललेली नाही. सामान्य कार्यकर्ता म्हणून ज्या लोकांमध्ये ते वावरले, त्याच जनसामान्यांशी आजही त्यांचे नाते कायम आहे.

किरणदादा सावरकर यांचा प्रवास हा एका सामान्य युवकाच्या असामान्य संघर्षाची कथा आहे. यात परिस्थितीशी दोन हात करण्याची जिद्द आहे, टीकेसमोर न झुकण्याचे धैर्य आहे, जनसेवेची तळमळ आहे आणि विश्वास ठेवणाऱ्या जनतेला दिलेल्या शब्दाची बांधिलकी आहे.

आज त्यांच्या वाढदिवसानिमित्त त्यांच्या संघर्षमय वाटचालीकडे पाहताना एक गोष्ट प्रकर्षाने जाणवते, ज्याच्या पाठीशी जनतेचा विश्वास असतो, त्याला परिस्थिती कितीही कठीण असली तरी पुढे जाण्यापासून कोणीही रोखू शकत नाही. संघर्षातून घडलेले नेतृत्व अधिक मजबूत असते. कारण त्या नेतृत्वाला सत्तेची किंमत पद मिळाल्यानंतर कळत नाही, तर पद मिळण्यापूर्वीच्या संघर्षातून कळलेली असते. वरुडच्या सामाजिक आणि राजकीय पटलावर स्वतःची स्वतंत्र ओळख निर्माण करणाऱ्या या युवा संघर्षयोद्धयाला वाढदिवसाच्या मनःपूर्वक शुभेच्छा...!

किरणदादांची संघर्षयात्रा अशीच जनसेवेच्या नव्या पर्वाकडे वाटचाल करत राहो, त्यांच्या नेतृत्वाला नवी उंची लाभो आणि जनसामान्यांच्या विश्वासाचे हे नाते अधिकाधिक दृढ होत राहो, हीच मनःपूर्वक सदिच्छा...!



ह.भ.प.डॉ.शंतनू महाराज रसे

# महात्मा गांधी : वन मॅन आर्मी

महात्मा गांधींचे नाव घेतले की, आपल्या डोळ्यांसमोर हातात काठी घेतलेला, पंचा नेसलेला, कृश देहयष्टीचा आणि चेहऱ्यावर विलक्षण शांत हास्य असलेला एक माणूस उभा राहतो. त्यांच्याकडे ना बंदूक होती, ना सैन्यदल; ना सत्ता होती, ना राज्ययंत्रणा. तरीही विसाव्या शतकातील सर्वांत शक्तिशाली साम्राज्याला आव्हान देणाऱ्या या माणसाला इतिहासाने असामान्य नैतिक शक्तीचा नेता म्हणून स्थान दिले. म्हणूनच महात्मा गांधींच्या व्यक्तिमत्त्वाकडे एका वेगळ्या दृष्टिकोनातून पाहिले, तर त्यांना तत्कालीन व्यवस्थेत 'वन मॅन आर्मी' असे म्हणण्यामागचा अर्थ लक्षात येतो.

२ ऑक्टोबर गांधी जयंतीला या महामानवाला अभिवादन करताना निद्रिस्त देशाला त्याच्या हक्काची जाणीव निर्माण करून संघर्ष करायला उभे करणाऱ्या या चेतनापुरुषापुढे प्रत्येक भारतीयाने आदराने नतमस्तक होणे, हीच त्यांना खरी आदरांजली ठरेल. मात्र येथे 'वन मॅन आर्मी' म्हणजे शस्त्र हातात घेऊन लढणारा एकटा सैनिक नव्हे. उलट, शस्त्राशिवाय हजारो निराधार, नि:शस्त्र, गरीब लोकांमध्ये लढण्याचे बळ निर्माण करणारा महापुरुष म्हणजे महात्मा गांधी. ज्यांचा कुणी नेता नाही, ज्यांच्या अन्यायाला वाचा नाही, ज्यांच्याकडे कोणतेही साधन-साहित्य-सामग्री नाही, अशा समुदायाला संघर्ष करण्याची शक्ती निर्माण करणारा एक माणूस, असा त्याचा अर्थ आहे.

कारण गांधीजींची सेना होती सत्याची; त्यांचे शस्त्र होते अहिंसा; त्यांची ढाल होती करुणा,त्यांची ताकद होती संयम आणि त्यांचे सर्वांत मोठे सामर्थ्य होते माणसाच्या अंतःकरणावरील विश्वास. या एका महामानवाने अत्यंत विदारक परिस्थितीमध्ये सर्व जाती धर्म गुण्यागोविंदाने नांदतील अशा भारताची स्वप्ने बघितली होती. नव्हे त्याची बीजे स्वतःच्या जीवनशैलीतून पेरली होती. आज भारत त्यांनी पेरलेल्या सत्य आणि अहिंसेच्या मार्गावर उभा राहिला आहे. एका माणसाने आपल्या समर्थकांच्या, अनुयायांच्या हजारो हातांनी हा देश उभा केला. म्हणून गांधी वन मॅन आर्मी आहेत.

**गांधींना 'महात्मा' ही उपाधी कोणी दिली**

रवींद्रनाथ टागोर यांनी १९१५ मध्ये गांधींना 'महात्मा' म्हटले. गांधी स्मृतीच्या माहितीनुसार नेताजी सुभाषचंद्र बोस यांनी ४ जून १९४४ रोजी आझाद हिंद रेडिओवरून गांधींना 'ऋरींहशी ेष ीहश छरींळेप' म्हणून संबोधले. राष्ट्रपिता म्हटले. परंतु 'जपश-चरप ईंपिवरी ऋौलश' हा उल्लेख या लेखाच्या शीर्षकाशी अधिक जवळचा आहे. भारताच्या फाळणीच्या काळात एकीकडे पंजाबमध्ये मोठ्या प्रमाणावर सैन्य तैनात असूनही हिंसा सुरू होती. त्याच वेळी दुसरीकडे गांधीजी कलकत्त्यात हिंदू-मुस्लिम ऐक्यासाठी काम करीत होते. २६ ऑगस्ट १९४७ रोजी लॉर्ड माउंटबॅटन यांनी गांधीजींना लिहिलेल्या पत्रात पंजाबमधील ५५ हजार सैनिकांचा संदर्भ देत बंगालमध्ये 'पश-रप' अशी एक आपली शक्ती असल्याचे नमूद केले. त्यांचा इशारा गांधीजींकडे होता. त्यांच्या बंगाल प्रांतातील एकट्या लढ्याकडे होता. गांधीजींना इंजपश-चरप ईंपिवरी ऋौलशङ्क म्हणून त्यांनी त्या विदारक परिस्थितीत आदरांजली अर्पण केली. त्यामुळे ही उपमा का महत्त्वाची आहे, हे कलकत्त्याच्या घटनांमधून समजते.

१९४७ च्या ऑगस्टमध्ये कलकत्ता सांप्रदायिक हिंसेच्या छायेत होता. गांधीजींनी सुरक्षित जागा शोधण्याऐवजी हिंसाग्रस्त भागात जाण्याचा निर्णय घेतला. १३ ऑगस्टला ते हुसैन शहीद सुहरावर्दी यांच्यासह बेलियाघाटा येथील हैदरी मॅन्शनमध्ये राहायला गेले. हा परिसर त्या वेळी तणावग्रस्त होता. गांधींच्या प्रार्थना, संवाद आणि प्रत्यक्ष लोकांमध्ये जाण्याच्या प्रयत्नांचा तेथील हिंसेवर परिणाम झाला. 'गांधी हेरिटेज पोर्टल ' या कालखंडाला कलकत्त्यातील 'चळीरलश्रश ेष उरश्रर्लीीं' म्हणून नोंदवते. इथे गांधीजींच्या 'वन मॅन आर्मी'चे खरे स्वरूप दिसते. त्यांनी सैन्य उभे केले नाही; त्यांनी माणसाच्या विवेकाला जागे करण्याचा प्रयत्न केला. त्यांनी विरोधकाला शत्रू मानले नाही. त्याच्या अंतःकरणाला आवाहन केले. त्यामुळे त्यांचा संघर्ष केवळ राजकीय नव्हता; तो माणसाच्या मनावर चालणारा संघर्ष होता.



**दक्षिण आफ्रिकेतील पाळेमुळे**

या शक्तीची मुळे दक्षिण आफ्रिकेत सापडतात. १८९३ मध्ये पीटरमार्टिझबर्ग येथे वैध तिकीट असूनही वर्णभेदामुळे गांधींना रेल्-वेच्या डब्यातून बाहेर फेकण्यात आले. त्यानंतर दक्षिण आफ्रिकेतील भारतीयांवरील भेदभावाविरुद्ध त्यांनी संघर्ष उभारला. याच काळात सत्याग्रहाची संकल्पना आकाराला आली. सत्याग्रह म्हणजे केवळ सरकारविरुद्ध आंदोलन नव्हते. गांधींच्या दृष्टीने सत्याग्रह म्हणजे सत्याचा आग्रह आणि अन्यायाविरुद्ध अहिंसक प्रतिकार. त्यामध्ये विरोधकाचा विनाश नव्हता; त्याच्या विवेकाला जागवण्याचा प्रयत्न होता. म्हणूनच गांधींची अहिंसा ही निष्क्रियता नव्हती. ती कृतीची, धैर्याची आणि आत्मसंयमाची पद्धत होती.

**दांडी मार्च प्रभावी उदाहरण**

दांडी मार्च हा त्याचा अत्यंत प्रभावी नमुना. १२ मार्च १९३० रोजी गांधी ७९ सहकाऱ्यांसह साबरमतीहून दांडीकडे निघाले. ब्रिटिश साम्राज्याच्या दृष्टीने क्षुल्लक वाटणाऱ्या मिठाच्या कायद्याला त्यांनी साम्राज्यविरोधी जनआंदोलनाचे प्रतीक बनवले. पुढे हजारो लोक या आंदोलनात सहभागी झाले. दांडी मार्चने सत्य आणि अहिंसेच्या नैतिक शक्तीला व्यापक जनशक्तीत रूपांतरित केले. म्हणूनच गांधीजींची 'सेना' ही संख्येची नव्हती; ती विश्वासाची होती. त्यांच्या एका आवाहनाने सामान्य माणूस मिठाचा कायदा मोडण्यासाठी समुद्राकडे निघाला. त्यांच्या एका आवाहनाने परदेशी वस्त्रांचा त्याग झाला. त्यांच्या एका आवाहनाने लाखो लोक स्वातंत्र्याच्या संघर्षात सहभागी झाले. त्यांनी रायफल किंवा मशीनगनच्या शक्तीऐवजी सामान्य माणसामध्ये असलेल्या नैतिक शक्तीला जागृत केले. याच कारणामुळे गांधीजींचा प्रभाव भारताच्या सीमा ओलांडून गेला.

**जगभरात गांधीजींचे अनुयायी**

जगामध्ये सर्वाधिक पुतळे विविध देशांत असणारे एकमेव व्यक्तिमत्त्व म्हणजे महात्मा गांधी. अमेरिकेतील नागरी हक्क चळवळीचे नेते मार्टिन ल्यूथर किंग ज्युनियर, दक्षिण आफ्रिकेतील नेल्सन मंडेला आणि इतर अनेक नेत्यांवर गांधींच्या विचारांचा प्रभाव पडला. राष्ट्रपतींच्या संदेशातही गांधींच्या विचारांनी किंग, मंडेला आणि इतर जागतिक नेत्यांना प्रभावित केल्याचे नमूद आहे. गोलमेज परिषदेला जेव्हा गांधीजी लंडनला गेले त्यावेळी ब्रिटनमधील नागरिक त्यांना बघायला रस्त्यांवर गर्दी करत. प्रचार-प्रसाराचा तो काळ नव्हता. आपल्या विरोधकांच्या मनामध्ये देखील त्यांनी या देशाबद्दल आत्मीयता निर्माण करण्याचे काम आपल्या वर्तनातून केले.

अल्बर्ट आइनस्टाइन यांनी गांधींबद्दल केलेले प्रसिद्ध विधानही त्यांच्या जागतिक प्रभावाचे द्योतक आहे. अशा प्रकारचा माणूस प्रत्यक्ष रक्तामांसात या पृथ्वीवर चालत होता, यावर पुढील पिढ्यांचा विश्वास बसणे कठीण जाईल.

गांधींच्या व्यक्तिमत्त्वातील आणखी एक महत्त्वाचा पैलू म्हणजे करुणा. त्यांच्यासाठी अहिंसा केवळ राजकीय तंत्र नव्हते. ती जीवनपद्धती होती. शब्दांतही हिंसा नको, विचारांतही हिंसा नको, विरोधकाबद्दलही द्वेष नकोङ्कअशी त्यांची भूमिका होती. विरोधकांमधल्या गुणवानांचीही कदर कशी करावी हे गांधींनी आपल्या पूर्ण आयुष्यात दाखवून दिले. त्यामुळे त्यांचे पक्के विरोधकही त्यांच्या व्यक्तिमत्त्वाच्या प्रेमात असायचे.

**बिकट परिस्थितीला सामोरे जाणारे व्यक्तिमत्त्व**

नोआखली असो, बिहार असो किंवा कलकत्ता गांधी हिंसेच्या केंद्रात गेले. १९४६-४७ च्या सांप्रदायिक हिंसेच्या काळात ते लोकांमध्ये राहिले, पायी फिरले, प्रार्थना केली, संवाद साधला आणि गरज पडली तेव्हा उपोषण केले. नोआखलीत त्यांचा पदयात्रेचा कालखंड हा त्यांच्या अहिंसक शांतता-प्रयत्नांचा महत्त्वाचा अध्याय आहे. याच ठिकाणी 'वन मॅन आर्मी' या शब्दाचा खरा अर्थ स्पष्ट होतो. जगात युद्धे जिंकण्यासाठी सैन्य असतात; पण माणसांच्या मनातील द्वेषावर विजय मिळवण्यासाठी कोणते सैन्य असते? गांधीजींनी या प्रश्नाचे उत्तर आपल्या आचरणातून दिले. त्यांनी सांगितले की शत्रूला पराभूत करण्यापेक्षा त्याच्या मनातील शत्रुत्व बदलणे अधिक मोठा विजय आहे.

आज जग पुन्हा हिंसा, युद्ध, द्वेष आणि असहिष्णुतेच्या प्रश्नांशी झुंजत आहे. अशा वेळी गांधीजींचे महत्त्व केवळ इतिहासातील एका स्वातंत्र्यलढ्याच्या नेत्यापुरते मर्यादित राहत नाही. त्यांची पद्धत आपल्याला वेगळा प्रश्न विचारतेङ्कशस्त्रांनी शांतता निर्माण करता येते का, की शांततेसाठी माणसाच्या अंतःकरणाला स्पर्श करणारी नैतिक शक्ती आवश्यक असते? गांधींचे उत्तर स्पष्ट होते. त्यांनी १९२० मध्ये ध्रींपस खपवळर मध्ये अहिंसेला मानवजातीच्या सर्वांत मोठ्या शक्तींपैकी एक मानले. त्यांच्या दृष्टीने अहिंसा म्हणजे दुर्बलतेचा स्वीकार नव्हता; ती अन्यायाला न झुकता, अन्याय करणाऱ्याविषयीही द्वेष न बाळगता लढण्याची शक्ती होती.

■ प्रवीण टाके
उपसंचालक (माहिती), विभागीय माहिती कार्यालय,छ.संभाजीनगर
९७०२८५८७७७

वरुड दर्पण हे पत्र संपादक, प्रकाशक, मालक चंद्रकांत भाऊरावजी भड यांनी माऊली मुद्राटेक, मुद्रक - चंद्रकांत भा.भड, जिजाऊ नगर, बस स्टॅन्ड रोड, वरुड जि.अमरावती येथे छापून वरुड दर्पण कार्यालय, जिजाऊ नगर, बसस्टॅन्ड रोड, वरुड, ता.वरुड, जि.अमरावती येथुन प्रकाशित केले. (सर्व वाद वरुड न्यायालयाअंतर्गत सोडविले जातील.) मोबा.९४२२१५७७१२, ७७४५०६७७१२

# दुष्काळाचे निकष ठरणार कळीचे

■ (प्रतिनीधी वरुड दर्पण)

**मुंबई** - केंद्र सरकारने २०१६ मध्ये दुष्काळ संहिता जाहीर करून दुष्काळ घोषित करण्यासाठीचे निकष निश्चित केले होते. महाराष्ट्र सरकारने या संहितेच्या आधारे २८ जून २०१८ मध्ये दुष्काळ जाहीर करण्याच्या अटी-शर्तींचा उल्लेख असलेला शासन निर्णय जारी केला. त्यानुसार राज्यात दुष्काळ जाहीर केला जातो.



दुष्काळ घोषित करण्याच्या प्रक्रियेत केवळ अपुरा पाऊसच नव्हे तर पिकांची स्थिती, पेरणीचे क्षेत्र, वनस्पती निर्देशांक, जमिनीतील ओलावा, भूजलस्थिती आणि प्रत्यक्ष पीक नुकसानीची पाहणी अशा विविध बाबींचा विचार केला जातो. त्यानुसार दुष्काळाचे मूल्यांकन टप्प्याटप्प्याने केले जाते.

### डॉ.मीना बंदे आदर्श स्कूल येथील

# विद्यार्थिनी कृतिकाची धावण्याच्या शर्यतीत जिल्हास्तरावर निवड

■ (प्रतिनिधी वरुड दर्पण)

**वरुड** - नवयुवक शिक्षण संस्था अंतर्गत डॉ. मीना बंदे आदर्श इंग्लिश स्कूल येथील विद्यार्थीनी कु.कृतिका रवींद्र वडस्कर हिने नुकत्याच वसंतराव नाईक हायस्कूल येथे पार पडलेल्या तालुकास्तरीय मैदानी क्रीडा स्पर्धेत धावण्याच्या शर्यतीमध्ये १०० मीटर धावणे यात तालुकास्तरावर प्रथम क्रमांक मिळवून जिल्हास्तरावर धावण्याच्या स्पर्धेत पात्र झाली आहे. तिने हा विजय डॉ.मीना बंदे आदर्श इंग्लिश स्कूल येथील क्रीडा शिक्षक शुभम कडू यांच्या मार्गदर्शनाखाली प्राप्त केला आहे. या यशाबद्दल तिचे सर्वत्र कौतुक होत आहे. नवयुवक शिक्षण संस्थेचे अध्यक्ष संजय गणोरकर, उपाध्यक्ष पुरुषोत्तम कळमकर, सचिव जगदीश नेरकर मुख्याध्यापिका नीता चिमोटे, आदर्श मराठी प्रायमरी शाळेचे मुख्याध्यापक नितेश वाघमारे शाळेतील सर्व शिक्षक शिक्षिका व शिक्षकेतर कर्मचारी यांनी तिचे अभिनंदन केले व पुढील यशासाठी शुभेच्छा दिल्या.



# दिव्यांगांचा अंत्योदय योजनेत समाविष्ट करा

### प्रहार अपंग क्रांती संघटनेमार्फत तहसीलदारांना निवेदन

■ (प्रतिनीधी वरुड दर्पण)

**वरुड** - दिव्यांग हा समाजाचा मूलभूत घटक आहे. समाधान जीवन जगत असताना त्याला अनेक अडीअडचणीचा सामना करावा लागतो, समाजातील बऱ्याचशा दिव्यांगाकडे आर्थिक उत्पन्नाचा स्त्रोत नसल्याने कमी असल्याने तो आपल्या कुटुंबाचे पालन पोषण व्यवस्थितपणे करू शकत नाही, त्यामुळे दिव्यांगांचा अंत्योदय योजनेत समाविष्ट करण्यात यावा अशी मागणी प्रहार अपंग क्रांती संघटनेमार्फत तहसीलदारांकडे एका निवेदनाव्दारे करण्यात आली आहे.




या निवेदनात नमुद करण्यात आले आहे की, सरकारतर्फे दिव्यांगासाठी अंत्योदय योजना सुरू केलेली आहे. शासन निर्णयानुसार प्रत्येक दिव्यांगला अंत्योदय योजनेत समाविष्ट करून घेणे गरजेचे आहे. तरीपण आज बरेचसे दिव्यांग या योजनेपासून वंचित आहे. त्यामुळे दिव्यांगाचा अंत्योदय योजनेमध्ये समाविष्ट करण्यात यावा अशी मागणी प्रहार अपंग संघटनेचे तालुकाध्यक्ष विलास पंडागळे, उपाध्यक्ष तुषार डांगोरे, तालुका संपर्कप्रमुख अजय चौधरी यांच्या नेतृत्वात निवेदन देण्यात आले व चर्चा करण्यात आली.वरील निवेदन देताना प्रमिला रक्षे, तारकेश्वर शेंडे, सतीश गुल्हाने, काजल भुजाळे, राजेंद्र सातपुते, युगल खेरडे, माधुरी गायकी, निलीमा देवघरे, अनिल अजमिरे, सुधीर देवघरे, नीलिमा दुपारे व अन्य दिव्यांग कार्यकत्यांनी केली आहे.

### सत्यशोधक फाऊंडेशन आणि सत्यशोधकी कार्यकर्त्यांद्वारे

# नागपुरच्या प्रा.डॉ.प्रकाश राठोड यांचे व्याख्यान

■ (प्रतिनीधी वरुड दर्पण)

**वरुड** - स्थानिक येथील सत्यशोधक फाऊंडेशन आणि सत्यशोधकी कार्यकर्त्यांद्वारे आयोजित क्रांतीसुर्य महात्मा ज्योतिबा फुले यांच्या द्विशताब्दी वर्षानिमित्त सत्यशोधक समाजाचा क्रांतिकारी आविष्कार या विषयावर सुप्रसिद्ध विचारवंत लेखक, प्रा.डॉ.प्रकाश राठोड नागपूर यांचे व्याख्यान महात्मा फुले महाविद्यालयाच्या डॉ.पंजाबराव देशमुख स्मृती सभागृहामध्ये आयोजित करण्यात आले होते.

क्रांतीसुर्य महात्मा फुलेंनी २४ सप्टेंबर १८७३ रोजी स्थापन केलेल्या सत्यशोधक समाज चळवळीला १५३ वर्ष पूर्ण होण्याचे औचित्य साधून स्थानिक वरुड येथील सत्यशोधक फाउंडेशन व समविचारी कार्यकर्त्यांनी सदर व्याख्यानाचा कार्यक्रम आयोजित केलेला होता. याप्रसंगी डॉ.प्रकाश राठोड म्हणाले की, भारताचे संविधान जे स्वातंत्र्य ,समता, बंधुता आणि न्यायावर आधारित आहे. हा महात्मा ज्योतिबा फुले यांनी स्थापन केलेल्या सत्यशोधक समाज चळवळीचा, कर्मवीर भाऊराव पाटील ,भाऊसाहेब पंजाबराव देशमुख, क्रांतीसुर्य महात्मा ज्योतिबा फुले, राजश्री छत्रपती शाहू महाराजांनी सुरू केलेल्या शाळा व वसतीगृहे हा सगळा क्रांतिसूर्य महात्मा ज्योतिबा फुले यांनी स्थापन केलेल्या सत्यशोधक समाजाचाच आविष्कार आहे. आता आपल्याला समता हवी की विषमता हवी हा निर्णय घेण्याची जबाबदारी देशातील सर्वच नागरिकांवर आहे असे उदगाार राठोड यांनी काढले.






सदर समारंभाचे अध्यक्षस्थानी माजी मंत्री व श्री शिवाजी शिक्षण संस्थेचे अध्यक्ष हर्षवर्धन देशमुख होते तर मुख्य अतिथी म्हणुन डॉ.मनोहर आंडे, सी.टी.पठाण, प्रा.अशोक ढवळे, डॉ.मीना बंदे, जगदीश काळे, विकास ठाकरे, निळकंठ यावलकर, प्राचार्य डॉ.दिलीप हांडे व अन्य मान्यवर उपस्थित होते .

या कार्यक्रमाला मोठ्या संख्येने विद्यार्थी व परिसरातील मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते. संचालन प्रा.गंगाधर दवंडे, प्रास्ताविक कॉ.अरविंद वानखडे तर आभार हिमानी आजणकर यांनी मानले.

कार्यक्रमाच्या यशस्वितेकरिता वासुदेव लांडगे, पुरुषोत्तम कळमकर, मनिष कुबडे, नितीन ठाकरे, प्रा.सोनार, पवार, प्रियंका जगदाळे, जयश्री अळसपुरे यांनी परिश्रम घेतले. कार्यक्रमाकरीता महात्मा फुले महाविद्यालयाचे अधीक्षक दिनेश राऊत यांचे विशेष योगदान लाभले.

### महिला आर्थिक विकास महामंडळ, सावित्रीबाई फुले लोकसंचालित साधन केंद्र अंतर्गत

# स्त्रीगौरव शेतकरी उत्पादक कंपनीची सर्वसाधारण सभा संपन्न

■ (प्रतिनिधी वरुड दर्पण)

**वरुड** - महिला आर्थिक विकास महामंडळ अंतर्गत सावित्रीबाई फुले लोकसंचालित साधन केंद्र अंतर्गत स्त्रीगौरव शेतकरी उत्पादक कंपनी लिमिटेड राजुरा बाजार येथे एफपीसीची सर्वसाधारण सभा वरिष्ठ जिल्हा समन्वय अधिकारी डॉ.रंजन वानखडे यांचे आदेशानुसार आयोजित करण्यात आली. या सभेस कृषी विभाग मधील कृषी सहाय्यक



कण्हेरे प्रमुख पाहुणे म्हणुन उपस्थित होते तसेच प्रीमुव्ह मधील कमलेश अजमिरे उपस्थित होते. संस्थाध्यक्षा मेघा भोरे, सीएमआरसी व्यवस्थापक अर्चना खांडेकर, उपजीविका सल्लागार हर्षद ताथोडे, सर्व संचालक मंडळाचे सदस्य, एफपीसीचे सभासद तसेच एफपीसी मधील सर्व कर्मचारी उपस्थित होते.

सभेदरम्यान अर्चना खांडेकर यांनी कार्यक्रमाची प्रस्तावना सादर करुन कंपनीचा लेखा सादर केला व कमलेश अजमिरे यांनी एफपीसीच्या पुढील कामकाजाबाबत मार्गदर्शन केले. एफपीसीच्या माध्यमातून शेतकरी सभासदांना अधिकाधिक सेवा उपलब्ध करुन देणे, संस्थेच्या व्यवसायवृद्धीसाठी योग्य नियोजन करणे तसेच एफपीसीची पुढील वाटचाल सक्षमपणे करण्याबाबत त्यांनी मार्गदर्शन केले.

त्यानंतर कण्हेर, कृषी विभागामार्फत राबविण्यात येणाऱ्या विविध योजनांची माहिती दिली तसेच महिला शेतकऱ्यांचे प्रमाणपत्र तयार करून घेण्याबाबत मार्गदर्शन केले. यासोबतच पोखरा योजनेअंतर्गत समाविष्ट असलेली गावे तसेच त्या गावांमध्ये मिळणारे विविध लाभ याबाबत सविस्तर माहिती उपस्थितांना देण्यात आली.

सभेमध्ये एफपीसीच्या विविध उपक्रमांबाबत तसेच शेतकरी सभासदांच्या हितासाठी राबविण्यात येणाऱ्या कार्यांबाबत चर्चा करण्यात आली. उपस्थित मान्यवरांनी मार्गदर्शन करुन एफपीसीच्या पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या. सभेच्या यशस्वी आयोजनासाठी संस्थेचे संचालक मंडळ, एफपीसीचे सभासद व सर्व कर्मचाऱ्यांचे सहकार्य लाभले.

# पुण्यात मुंबा आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सव

■ (प्रतिनीधी वरुड दर्पण)

**पुणे** - मुंबा फिल्म फाऊंडेशनतर्फे आयोजित सातवा मुंबा आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सव ६ ते १० ऑक्टोबर २०२६ या कालावधीत पुण्यात होणार आहे. ४१ देशांमधून आलेल्या ९८७ चित्रपटांमधून निवडलेल्या १५२ चित्रपटांचे या महोत्सवात प्रदर्शन करण्यात येणार आहे. महोत्सवाचे आयोजक जय भोसले आणि महोत्सव संचालक वीरेंद्र चित्राव यांनी बुधवारी (दि.१) पत्रकार परिषदेत ही माहिती दिली. यावेळी महोत्सवाचे व्यवस्थापकीय संचालक अभिषेक अवचार, सहसचिव रोहित राव नरसिंगे, श्रुती शेंबेकर, प्रियांका चौधरी, रेणुका अग्रवाल तसेच मराठवाडा महाविद्यालयाच्या प्रतिनिधी नूतन कुलकर्णी उपस्थित होते. यंदाच्या महोत्सवात केंद्र सरकारच्या माहिती व प्रसारण मंत्रालयासह नॅशनल फिल्म डेव्हलपमेंट कॉर्पोरेशन आणि फिल्म अँड टेलिव्हिजन इन्स्टिट्यूट ऑफ इंडिया (एफटीआयआय) यांचा सहभाग आहे.

# फुटपाथवरील राहुलचा वाढदिवस जिनिंग कार्यालयात साजरा

### युवा व्यापारी लोकेश अग्रवाल व मित्रपरिवाराचा अनोखा उपक्रम

■ (प्रतिनीधी वरुड दर्पण)

**वरुड** - सद्य: वाढदिवस म्हटला की, फक्त मोठ्या नेत्याचा किंवा पैशाने श्रीमंत असलेल्या व्यक्तीचाच साजरा केला जातो आणि शुभेच्छा देण्यासाठी गर्दी होते. मात्र या प्रथेला फाटा देत येथील युवा व्यापारी लोकेश अग्रवाल यांनी समाजासमोर माणुसकीचे वेगळे उदाहरण ठेवले आहे. शहरात लोकेश अग्रवाल हे त्यांच्या सामाजिक कार्यासाठी ओळखले जातात. स्मशानातील सफाई कामगार महिलेचा वाढदिवस साजरा करणे असो किंवा दिवाळी-दसऱ्याला गोरगरीब, दिनदुबळ्यांना किराणा, कपडे वाटप करणे, ही त्यांची जणु सवयच बनली आहे आणि यातुनच त्यांना खरे समाधान मिळते.



त्याच सामाजिक बांधिलकीतून आज त्यांनी एक आगळा उपक्रम राबविला. वरुड बसस्थानकावर भीक मागुन आपला उदरनिर्वाह करणारे राहुल मसाने (वय ३४, रा.मालखेड) या दिव्यांग व्यक्तीचा वाढदिवस त्यांनी आपल्या व्यवसायाच्या ठिकाणी बोलावुन मोठ्या उत्साहात साजरा केला. केक कापुन, नवीन कपडे देऊन त्याचा आनंद द्विगुणित केला. हा विरोधाभास पाहून अनेकांचे डोळे पाणावले तर समाजातून अग्रवाल यांच्या या कृतीचे सर्वत्र कौतुक होत आहे.

याप्रसंगी प्रदीप चौधरी, अंकुश पाबळे, मनोज कडू, योगेश लोखंडे, अमोल मांडले, निलेश बेले आदी मित्र परिवार उपस्थित होता. लोकेश अग्रवाल हे वर्षभर असे अनेक गरजु लोकांना मदतीचा हात देत असतात, हे विशेष.

### जरूडच्या कला व वाणिज्य महाविद्यालयामध्ये

# प्राचार्य डॉ.जी.आर.तडस यांचे मार्गदर्शनाखाली ५० वृक्षांचे रोपण

■ (प्रतिनीधी वरुड दर्पण)

**वरुड** - श्री शिवाजी संस्था अमरावती द्वारा संचालित व संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ अमरावती द्वारा संलग्नित जरुड येथील कला व वाणिज्य महाविद्यालयामध्ये महाराष्ट्र शासनाच्या मार्गदर्शक सूचनेनुसार प्राचार्य डॉ.जी.आर.तडस यांच्या मार्गदर्शनाखाली रासेयो विभागाच्या वतीने महाविद्यालय परिसरात ५० वृक्षांचे रोपण करण्यात आले."



यामध्ये चिंच, सीताफळ, फणस चिक्कू, पिंपळ, कडूनिंब, आंबा, वड, बेल,अशोक, खैर, सिसम, उंबर, आपटा, शमी, शिवण इत्यादी वृक्षारोपण करण्यात आले. वृक्ष लागवड करणे ही आज काळाची गरज आणि आपले नैतिक कर्तव्य ठरते, असे प्रतिपादन प्राचार्य डॉ.जी.आर.तडस यांनी केले.

समाज कल्याण विभागाच्या तेजस्विनी भोसले यांचे हस्ते वृक्षारोपण करण्यात आले. याप्रसंगी डॉ.राम कुलसंगे, डॉ.विनायक भटकर, डॉ.अजय कुकडे, डॉ.विष्णु पडवाल, डॉ.रविकांत महिंदकर, रासेयो कार्यक्रमाधिकारी डॉ.शशिकांत काळे तसेच महिला रासेयो कार्यक्रमधिकारी अर्चना राऊत, प्रमोद पाटील, निलेश खुरद, डॉ.प्रज्ञा निंभोरकर, प्रा.ज्योती मरस्कोल्हे, डॉ.पुजा महाले, प्रा.प्रदीप आवारे, प्रा.लिलाधर चौधरी, प्रा.समीक्षा बिडकर, प्रा.रुपाली सवई, प्रा.तेजश्री घोटकर, प्रा.सिमा कानडे, प्रा.श्वेता लोखंडे, प्रा.रेणुका वानखडे, निलेश बंदे, रासेयो स्वयंसेवक तनुजा पोकळे, आदित्य उमेकर, किरण खंते, रागिनी बारमासे, कृतिका चरपे, गायत्री भंडारे, कृणाल चव्हाण, पवन धुर्वे, अभिषेक धुर्वे, अजय ढोमणे, ईश्वरी बोहरुपी, ऋतुजा ढोकणे, भूमिका ढोकणे, देवश्री शेंडे, लवकेश नांदणे, हर्षल हिरणवार, पियुष बडोदेकर, वैष्णव नरसिंगकर, यशवंत कुसराम, कृणाल चव्हाण, योगेश कुरवाडे, अक्षय बहुरूपी, चैतन्य रावेकर, चंदन देशमुख, नकुल कुरवाडे इत्यादी विद्यार्थी मोठया संख्येने उपस्थित होते.


**सोने-चांदीचे दर**

शुध्द सोने -१५०२८० रु.(१०ग्रॅम)

२२.कॅ सोने - १३७७६०रु.(१०ग्रॅम)

चांदी - २,३५,००० रु. (प्र.किलो)


**कृषी उत्पन्न बाजार समिती अमरावती**

**बाजारभाव ( क्विंटलमध्ये )**

| | | |
|---|---|---|
| ज्वारी - | १६५० - | २००० |
| गहू - | २५०० - | ३००० |
| तूर - | ६१०० - | ६३९० |
| मूग - | ६५०० - | ७००० |
| उडीद - | ६००० - | ७००० |
| हरभरा - | ५६०० - | ५९०० |
| सोयाबिन - | ४१०० - | ४३५० |
| बाजरा - | २००० - | २३०० |
| तिळ - | ८२०० - | ९३०० |
| भुईमूग - | ५१५० - | ५३५० |
| मका - | २२०० - | २३०० |

# महिला शेतकरी प्रमाणपत्र योजनेचा लाभ घ्यावा

## माजी प.स.सदस्य अंजली तुमराम यांचे आव्हान

*(प्रतिनीधी वरुड दर्पण)*



**वरुड** - महाराष्ट्र शासनाच्या कृषी विभागामार्फत महिला शेतकरी प्रमाणपत्र देण्याची विशेष मोहीम सुरू करण्यात आली आहे, अमरावती जिल्ह्यातील सर्व महिला भगिनींनी या योजनेचा अधिकाधिक लाभ घ्यावा असे आवाहन माजी पं.समिती सदस्या अंजली तुमराम यांनी केले आहे.

यासंदर्भात यांनी प्रसिध्दी दिलेल्या प्रत्रकात नमुद केले आहे की, जमीन ही स्वतःच्या मालकीची नसली तरी शेतकरी महिला, शेतमजूर आणि शेतीपूरक व्यवसाय करणाऱ्या सर्व महिला पात्र असून त्यांनाही प्रमाणपत्र मिळणार आहे. कृषी क्षेत्रातील सर्व सुविधांचा लाभ घेण्यासाठी हे प्रमाणपत्र महत्त्वाचे ठरणार आहे. तसेच पीक कर्ज कृषी कर्ज व पिक विम्याची प्रक्रिया आधुनिक कृषी तंत्रज्ञान आणि शासकीय प्रशिक्षणामध्ये सहभाग घेण्यासाठी या प्रमाणपत्राचा उपयोग होणार आहे. महिलांना कृषी क्षेत्रातील अधिकृत शासकीय ओळख मिळणार आहे, यामध्ये अठरा वर्ष वरील सर्व मुली प्रत्यक्ष शेती करणाऱ्या भगिनी, शेतमजुरीकरणाऱ्या भगिनी, शेती पूरक व्यवसाय करणाऱ्या भगिनी, दुग्ध व्यवसाय करणाऱ्या भगिनी, कुक्कुटपालन तसेच फळबाग शेती करणाऱ्या सर्व भगिनीचा यामध्ये समावेश करण्यात आलेला आहे. अर्जाची पडताळणी ग्रामसभा ग्रामपंचायत किंवा नगरपंचायत मार्फत करण्यात येणार असून पंधरा दिवसाच्या आत हे प्रमाणपत्र वितरित करण्यात येणार आहे. या नोंदणीसाठी लागणारे कागद पत्रे म्हणजे आधार कार्ड आणि आधार कार्ड लिंक असलेला मोबाईल नंबर आवश्यक आहे. कृषी विभागाच्या अधिकृत वेब पोर्टलवर नोंदणी करून पात्र महिला भगिनींनी हे प्रमाणपत्र मिळवून घ्यावे किंवा गावागावात कॅम्प आयोजित करून नोंदणी करूनही प्रमाणपत्र मिळवता येईल असे आवाहन केलेले आहे.

# शनिवार व रविवारी मोर्शीत 'ग्रंथोत्सव'

## जिल्हाधिकारी आशिष येरेकर यांच्या हस्ते उदघाटन

*(प्रतिनिधी वरुड दर्पण)*



**अमरावती** - जिल्हा ग्रंथालय अधिकारी कार्यालयाच्या वतीने शनिवार, ३ व रविवार,४ ऑक्टोबर रोजी मोर्शी येथील पंजाबबाबा सभागृहात 'ग्रंथोत्सव-२०२६' चे आयोजन करण्यात आले आहे. जिल्हाधिकारी आशिष येरेकर यांच्या हस्ते ग्रंथोत्सवाचे उद्घाटन होणार असून ग्रंथ प्रदर्शन व विक्रीसोबतच विविध साहित्यिक व सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. ग्रंथप्रेमी,साहित्य रसिक नागरिकांना या उपक्रमात सहभागी होण्याचे आवाहन, जिल्हा ग्रंथालय अधिकारी तथा ग्रंथोत्सव समितीचे सदस्य सचिव डॉ.अतुल वानखडे यांनी केले आहे.

महाराष्ट्र राज्य सांस्कृतिक धोरणांतर्गत जिल्हा ग्रंथालय अधिकारी कार्यालयाच्यावतीने दोन दिवशीय ग्रंथोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे. विभागीय आयुक्त नयना गुंडे यांच्या प्रमुख उपस्थितीत जिल्हाधिकारी आशिष येरेकर यांच्या हस्ते ३ ऑक्टोबर रोजी सकाळी ११ वा. ग्रंथोत्सवाचे उद्घाटन होणार असून ज्येष्ठ साहित्यिक विठ्ठल कुलट हे विशेष अथिती म्हणून उपस्थित राहरणार आहेत ग्रंथालय संचालक अशोक गाडेकर हे कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी असणार आहेत. तत्पूर्वी, उपविभागीय अधिकारी प्रदीप पवार यांच्या प्रमुख उपस्थितीत सकाळी १० वा. ग्रंथ दिंडी काढण्यात येणार आहे.

ग्रंथोत्सवाच्या पहिल्या दिवशी दुपारी १२ वा. 'भारताचा रक्तरंजीत इतिहास' विषयावर प्रा.जगदिश पाटील यांचे व्याख्यान होणार आहे सहायक ग्रंथालय संचालक डॉ.राजेश पाटील हे अध्यक्षस्थानी असतील. दुपारी १ ते १.३० वाजेदरम्यान प्रसिद्ध कवी धीरज चावरे हे 'हास्य कवितांचा विनोदी कार्यक्रम' सादर करणार आहेत. तर दुपारी २ ते ४.३० वा. दरम्यान 'पुस्तकाची मैत्री' विषयावर परिसंवाद होणार आहे.

दुसऱ्या दिवशी सकाळी ११ ते दुपारी १ वाजे दरम्यान दोन व्याख्यान आणि एकपात्री प्रयोग सादर होणार आहेत. त्यातील पहिले व्याख्यान 'सार्वजनिक ग्रंथालयामधील सॉफ्ट स्किल्स आंतरवैयक्तीक कौशल्य आणि व्यावसायीक क्षमता' विषयावर डॉ.रविंद्र सरोदे यांचे तर 'वाचन संस्कृती काल आज आणि उद्या' विषयावर डॉ.राजेश बोबडे यांचे व्याख्यान होणार आहे. दुपारी २ ते ४ वाजे दरम्यान 'कविसंमेलन' होणार आहे. प्रसिद्ध गझलकार नितीन देशमुख अध्यक्ष स्थानी असतील तर गजानन देशमुख, विशाल मोहोड, किशोर जराड, अलका तालनकर, संदीप देशमुख, प्रणाली देशमुख, विशाल कनेकर हे कवि सहभाग घेणार आहेत. विभागीय ग्रंथालय संघाचे प्रभाकर घुगे हे अध्यक्ष स्थानी असतील तर शासकीय विभागीय ग्रंथालयाचे जिल्हा ग्रंथालय अधिकारी संजय बनसोड आणि जिल्हा ग्रंथालय संघाचे अध्यक्ष चंद्रकांत चांगदे हे प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित राहणार आहेत.

# समाज संघटन मजबूत करून युवकांना विकासाच्या प्रवाहात आणणार : निलेश जामठे

## शिंदी येथे राष्ट्रीय चर्मकार महासंघाची नूतन कार्यकारिणी जाहीर

*(प्रतिनीधी वरुड दर्पण)*

**अचलपूर** - तालुक्यातील शिंदी येथे राष्ट्रीय चर्मकार महासंघाची नूतन शाखा कार्यकारिणी नियुक्तीपत्र देऊन जाहीर करण्यात आली. समाज संघटन अधिक मजबूत करणे, युवकांना संघटित करणे तसेच सामाजिक व शैक्षणिक उपक्रमांच्या माध्यमातून समाजाच्या प्रगतीसाठी कार्य करण्याचा निर्धार यावेळी करण्यात आला.



यावेळी राष्ट्रीय चर्मकार महासंघाचे जिल्हाध्यक्ष निलेश जामठे, जिल्हा उपाध्यक्ष मनोहर कोथळकर, तालुका अध्यक्ष राम लाहाळके, तालुका सचिव सुरेश काकडे, तालुका उपाध्यक्ष किशोर पाचखंडे, ज्येष्ठ मार्गदर्शक मनोहर वानरे,सामाजिक कार्यकर्ते साहेबराव शिवणकर,नरेंद्र इंगळे आदी उपस्थित होते. शिंदी शाखा अध्यक्षपदी मधुकर गुलाब इंगळे, उपाध्यक्षपदी विठ्ठल पखाले, सचिवपदी अतुल चिमणकर यांची नियुक्ती करण्यात आली. सदस्य म्हणून श्रीरामजी मालखेडे, देवीदास रेवसकर, गणेश इंगळे, मनोहर इंगळे, रामेश्वर इंगळे व संजय इंगळे यांची निवड करण्यात आली.

युवा आघाडीच्या अध्यक्षपदी अविनाश विजय इंगळे, उपाध्यक्ष कार्तिक मनोहर इंगळे, सचिव कुणाल अमोल चिमणकर, कोषाध्यक्ष रोषन विठ्ठल पखाले, सहसचिव प्रमेय गणेश इंगळे, कार्याध्यक्ष अनुज मनोहर इंगळे, सह-कोषाध्यक्ष आशिष मधुकर इंगळे व सदस्य अमोल लक्ष्मण चिमणकर यांची नियुक्ती करण्यात आली. नवनियुक्त पदाधिकाऱ्यांना नियुक्तीपत्र देऊन त्यांचे अभिनंदन करण्यात आले. समाजातील युवक व महिलांना संघटनेच्या माध्यमातून जोडून सामाजिक, शैक्षणिक व समाजहिताचे उपक्रम राबविण्यावर भर देण्यात येणार असल्याचे यावेळी सांगण्यात आले.

# सातारा जिल्हा बँकेसाठी २३६ अर्ज : दिग्गजांच्या उमेदवारीने निवडणुकीत रंगत

*(प्रतिनीधी वरुड दर्पण)*



**कराड** - सातारा जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या संचालक मंडळाच्या पंचवार्षिक निवडणुकीसाठी उमेदवारी अर्ज दाखल करण्याच्या शेवटच्या दिवशी गुरुवारी १७० उमेदवारांनी तब्बल २३६ नामनिर्देशनपत्रे दाखल केली. बँकेच्या २१ संचालकपदांसाठी अर्जांची संख्या मोठी झाल्याने आता ५ ऑक्टोबर रोजी होणाऱ्या छाननीनंतर आणि त्यानंतरच्या माघारीच्या टप्प्यात निवडणुकीचे अंतिम चित्र स्पष्ट होणार आहे.

अर्ज दाखल करण्याच्या शेवटच्या दिवशी निवडणूक कार्यालयात उमेदवार, सूचक, समर्थक आणि कार्यकर्त्यांची मोठी गर्दी झाली होती. ग्रामविकास मंत्री जयकुमार गोरे, मदत व पुनर्वसन मंत्री मकरंद पाटील, सार्वजनिक बांधकाम मंत्री शिवेंद्रसिंहराजे भोसले, पालकमंत्री शंभूराज देसाई, राष्ट्रवादी काँग्रेस (शरदचंद्र पवार) पक्षाचे प्रदेशाध्यक्ष शशिकांत शिंदे, शिंदे गटाचे शेखर गोरे यांच्यासह विविध राजकीय गटांतील प्रमुखांनी अर्ज दाखल केले.

विकास सेवा सोसायटी मतदारसंघातील ११ जागांसाठी विविध तालुक्यांत मोठ्या संख्येने अर्ज दाखल झाले आहेत.

कुटुंबातील चेहरे रिंगणात सातारा जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या २१ संचालकपदांसाठी तब्बल २३६ अर्ज दाखल झाल्याने निवडणुकीतील चुरस वाढली आहे. बँकेवरील आपला राजकीय प्रभाव कायम ठेवण्यासाठी काही नेत्यांनी पर्यायी उमेदवार म्हणून कुटुंबातील सदस्यांनाही रिंगणात उतरविल्याचे चित्र आहे.


## जाहीर नोटीस

**बॉम्बे रेग्युलेशन १८२७ चे कलम ८ अन्वये वरुड येथील श्री.व्ही.व्ही.राजुरकर दिवाणी न्यायाधीश ( क.स्तर ) वरुड यांचे न्यायालयात**

**एम.जे.सी.क्रं.८६६/२०२६** **ने.ता.०२/११/२०२६**

**अर्जदार :-** १) प्रणिता श्रीकृष्ण वानखडे, वय अं.३७ वर्ष, धंदा-घरकाम,रा.आलोडा, २) सुषमा भागवतराव सोनारे, वय अं.४४ वर्ष, धंदा-घरकाम, रा.चणकापूर, ३) अनीता नरेंद्र पंडागळे, वय अं.३५ वर्ष, धंदा-घरकाम, रा.वरला, ता.मोर्शी, ४) दिपावली संदीप सातंगे, वय अं.३१ वर्ष, धंदा-घरकाम, रा.भांबोरा, ता.मोर्शी, ५) नर्मदा मनोहरराव बोहरपी, वय अं.६५ वर्ष, धंदा-घरकाम, ६) राहुल मनोहरराव बोहरपी, वय अं.३१ वर्ष, धंदा-घरकाम, अर्जदार क्र.५ व ६ रा.करजगाव, ता.वरुड

**... विरुध्द ...**

**गैरअर्जदार :-** **निरंक**

ज्याअर्थी वरील अर्जदार यांनी **मयत मनोहर उदेभानजी बहुरुपी, रा.करजगाव, ता.वरुड, जि.अमरावती** यांचे अर्जदार हे कायदेशीर वारसदार म्हणुन घोषित करण्याकरीता विद्यमान न्यायालयात बॉम्बे रेग्युलेशन १८२७ चे कलम ८ अन्वये वारस हक्क प्रमाणपत्र मिळण्याबाबत अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी ज्या कोणास वरील अर्जदार यांचे विरुध्द काही आक्षेप किंवा हरकत घ्यावयाची असेल तर त्यांनी नोटीस प्रसिध्दीपासुन ३० दिवसाचे आत किंवा **दि.०२/११/२०२६** रोजी सकाळी १०.३० वाजता वरुड न्यायालयात व्यक्तिगत किंवा रितसर निर्दीष्ट केलेल्या वकीलामार्फत हजर राहावे तसे न केल्यास उक्त अर्जाची सुनावनी होवुन निकाल दिला जाईल. आज तारीख **०२/१०/२०२६** रोजी माझे सहीने व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

न्यायालयाचा शिक्का

**आदेशानुसार**
**सहाय्यक अधिक्षक**
**दिवाणी व फौजदारी न्यायालय, वरुड**

## जाहीर नोटीस

**बॉम्बे रेग्युलेशन १८२७ चे कलम ८ अन्वये वरुड येथील श्री.व्ही.व्ही.राजुरकर दिवाणी न्यायाधीश ( क.स्तर ) वरुड यांचे न्यायालयात**

**एम.जे.सी.क्रं.८६७/२०२६** **ने.ता.०२/११/२०२६**

**अर्जदार :-**

१) सैय्यद सलीम सैय्यद हुसेन, वय अं.५१ वर्ष, धंदा-मजुरी

२) सैय्यद साबीर सैय्यद हुसेन, वय अं.५० वर्ष, धंदा- मजुरी

३) शहेजादी बी सैय्यद हुसेन, वय अं.७५ वर्ष, धंदा-घरकाम

रा.लोणी, ता.वरुड, जि.अमरावती

**... विरुध्द ...**

**गैरअर्जदार :-** **निरंक**

ज्याअर्थी वरील अर्जदार यांनी **मयत सैय्यद हुसेन सैय्यद टुल्लू, रा.लोणी, ता.वरुड, जि.अमरावती** यांचे अर्जदार हे कायदेशीर वारसदार म्हणुन घोषित करण्याकरीता विद्यमान न्यायालयात बॉम्बे रेग्युलेशन १८२७ चे कलम ८ अन्वये वारस हक्क प्रमाणपत्र मिळण्याबाबत अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी ज्या कोणास वरील अर्जदार यांचे विरुध्द काही आक्षेप किंवा हरकत घ्यावयाची असेल तर त्यांनी नोटीस प्रसिध्दीपासुन ३० दिवसाचे आत किंवा **दि.०२/११/२०२६** रोजी सकाळी १०.३० वाजता वरुड न्यायालयात व्यक्तिगत किंवा रितसर निर्दीष्ट केलेल्या वकीलामार्फत हजर राहावे तसे न केल्यास उक्त अर्जाची सुनावनी होवुन निकाल दिला जाईल. आज तारीख **०२/१०/२०२६** रोजी माझे सहीने व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

न्यायालयाचा शिक्का

**आदेशानुसार**
**सहाय्यक अधिक्षक**
**दिवाणी व फौजदारी न्यायालय, वरुड**

## जाहीर नोटीस

**बॉम्बे रेग्युलेशन १८२७ चे कलम ८ अन्वये वरुड येथील दिवाणी न्यायाधीश ( क.स्तर ) वरुड, ( इन चॉर्ज श्री.व्ही.व्ही.राजुरकर साहेब ) यांचे न्यायालयात**

**एम.जे.सी.क्रं.८६३/२०२६** **ने.ता. /१०/२०२६**

**अर्जदार :-** १)साहेबराव वामनराव भोजने, वय अं.७० वर्ष, धंदा-शेती, २)धनराज वामनराव भोजने, वय अं.६८ वर्ष, धंदा-शेती, रा.अमरावती, ता.जि.अमरावती, ३)गोपाल वामनराव भोजने, वय अं.६५ वर्ष, धंदा-शेती, क्र.१ व ३ रा.पेठ मांगरुळी, ता.वरुड, जि.अमरावती, ४)सौ.शोभा भाऊराव कोठे, वय अं.६१ वर्ष, धंदा-घरकाम, रा.पिंपळानारायणा, ता.जि.पांढुर्णा, ५)सौ.प्रभा प्रमोदराव इंगोले, वय अं.५७ वर्ष, धंदा-घरकाम, रा.मदना, ता.नरखेड, ६)सौ.लता सुधाकर गावंडे, वय अं.५५ वर्ष, धंदा-घरकाम, रा.आनंदवाडी, ता.आष्टी, जि.वर्धा

**... विरुध्द ...** **गैरअर्जदार :-** **निरंक**

ज्याअर्थी वरील अर्जदार यांना **मयत जनाबाई सिताराम भोजने व वामन सिताराम भोजने, रा.पेठ मांगरुळी, ता.वरुड, जि.अमरावती** यांचे अर्जदार हे कायदेशीर वारसदार म्हणुन घोषित करण्याकरीता विद्यमान न्यायालयात बॉम्बे रेग्युलेशन १८२७ चे कलम ८ अन्वये वारस हक्क प्रमाणपत्र मिळण्याबाबत अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी ज्या कोणास वरील अर्जदार यांचे विरुध्द काही आक्षेप किंवा हरकत घ्यावयाची असेल तर त्यांनी नोटीस प्रसिध्दीपासुन ३० दिवसाचे आत किंवा **दि. /१०/२०२६** रोजी सकाळी १०.३० वाजता वरुड न्यायालयात व्यक्तिगत किंवा रितसर निर्दीष्ट केलेल्या वकीलामार्फत हजर राहावे तसे न केल्यास उक्त अर्जाची सुनावनी होवुन निकाल दिला जाईल. आज तारीख **२४/०९/२०२६** रोजी माझे सहीने व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

न्यायालयाचा शिक्का

**आदेशानुसार**
**सहाय्यक अधिक्षक**
**दिवाणी व फौजदारी न्यायालय, वरुड**

## जाहीर नोटीस

**बॉम्बे रेग्युलेशन १८२७ चे कलम ८ अन्वये वरुड येथील दिवाणी न्यायाधीश ( क.स्तर ) वरुड, ( इन चॉर्ज श्री.व्ही.व्ही.राजुरकर साहेब ) यांचे न्यायालयात**

**एम.जे.सी.क्रं.८२७/२०२६** **ने.ता.०१/१०/२०२६**

**अर्जदार :-**

१) तुषार तानाजी खराडे, वय अं.४२ वर्ष, धंदा-मजुरी

२) अनिकेत तानाजी खराडे, वय अं.३८ वर्ष, धंदा- मजुरी

क्र.१ व २ रा.पेठ.मांगरुळी, ता.वरुड, जि.अमरावती

**... विरुध्द ...**

**गैरअर्जदार :-** **निरंक**

ज्याअर्थी वरील अर्जदार यांना **मयत तानाजी माधवराव खराडे व मयत जयश्री तानाजी खराडे, रा.पेठ मांगरुळी, ता.वरुड, जि.अमरावती** यांचे अर्जदार हे कायदेशीर वारसदार म्हणुन घोषित करण्याकरीता विद्यमान न्यायालयात बॉम्बे रेग्युलेशन १८२७ चे कलम ८ अन्वये वारस हक्क प्रमाणपत्र मिळण्याबाबत अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी ज्या कोणास वरील अर्जदार यांचे विरुध्द काही आक्षेप किंवा हरकत घ्यावयाची असेल तर त्यांनी नोटीस प्रसिध्दीपासुन ३० दिवसाचे आत किंवा **दि.०१/१०/२०२६** रोजी सकाळी १०.३० वाजता वरुड न्यायालयात व्यक्तिगत किंवा रितसर निर्दीष्ट केलेल्या वकीलामार्फत हजर राहावे तसे न केल्यास उक्त अर्जाची सुनावनी होवुन निकाल दिला जाईल.

आज तारीख **२४/०९/२०२६** रोजी माझे सहीने व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

न्यायालयाचा शिक्का

**आदेशानुसार**
**सहाय्यक अधिक्षक**
**दिवाणी व फौजदारी न्यायालय, वरुड**




# झुरळांचे आज 'चलो शिवाजी पार्क'; ज्ञानेश कुमारांच्या राजीनाम्यासाठी सीजेपीचे देशव्यापी आंदोलन

■ (प्रतिनिधी वरुड दर्पण)

**मुंबई** – 'नीट' परीक्षेतील गैरव्यवहाराविरुद्ध दिल्लीतील जंतरमंतर येथे आंदोलनाचे रान उठवून तत्कालीन शिक्षण मंत्री धर्मेंद्र प्रधान यांना राजीनामा देण्यास भाग पाडणाऱ्या कॉकरोच जनता पार्टीने (सीजेपी) आता आपला मोर्चा मुख्य निवडणूक आयुक्तांकडे (सीईसी) वळिवला आहे. ज्ञानेश

## शहांनी केलेली चूक फडणवीसांनी टाळावी - अभिजित दीपके



कुमार यांच्या राजीनाम्याच्या मागणीसाठी देशभरात आंदोलन पुकारण्याचा तसेच ऑक्टोबर महिन्याच्या अखेरीस दिल्लीतील जंतरमंतर येथे तीव्र आंदोलन करण्याचा इशारा कॉकरोच जनता पार्टीचे (सीजेपी) संस्थापक अभिजीत दीपके यांनी गुरुवारी येथे दिला.

दिल्लीमध्ये केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी विद्यार्थ्यांवर किंबहुना आंदोलकांवर लाठीचार्ज करून चूक केली. ती चूक महाराष्ट्रामध्ये मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी करू नये. प्रशासनाने आंदोलन करण्याची परवानगी दिली असो वा नसो शुक्रवारी शिवाजी पार्कवर आम्ही आंदोलन करणारच आहोत, असा निर्धारही दीपके यांनी व्यक्त केला. ते मुंबई प्रेस क्लबमध्ये आयोजित पत्रकार परिषदेत बोलत होते. आंदोलन आपोआप मोठे होईल

दीपके म्हणाले की, गेल्या १२ वर्षांपासून लोक घाबरले होते. मात्र, आता लोक घाबरत नाहीत, लोक घराघरातून आंदोलनाला येतील.

### ३ दिवसांपासून बेपत्ता असलेल्या

# ऋतिकचा अखेर विहिरीत आढळला मृतदेह

■ (प्रतिनीधी वरुड दर्पण)

**वरुड** – सायंकाळी ६ वाजता घरुन बाहेर फिरण्याकरीता जातो, असे सांगून घराबाहेर पडलेल्या युवकाचा शेतातील विहिरीत मृतदेह आढळून आल्याची घटना आज सकाळच्या सुमरास शेंदूरजनाघाट येथे उघडकीस आली.

गेल्या दोन दिवसांपूर्वी शेंदूरजनाघाट येथील आझाद चौक परिसरातील रहिवासी असलेला ऋतिक हा सायंकाळच्या सुमारास बाहेर फिरायला जातो असे सांगून घरून निघून गेला होता. रात्र होऊन सुद्धा तो



परत न आल्यामुळे कुटुंबीयांनी शोध घेतला.

त्याचा सर्वत्र नातेवाईक आणि मित्रपरिवार यांच्याकडे सुद्धा ऋतिक बाबत माहिती घेण्यात आली परंतु तो कुठेही आढळून आला नाही. अखेर शेंदुरजनाघाट पोलिसात ऋतिक हविल्याबाबत तक्रार दाखल करण्यात आली. पोलिसांनी सुद्धा ऋतिकचा सर्वत्र शोध घेतला परंतु तो कुठेही आढळून आला नाही. आज सकाळी ८ वाजता मृतक ऋतिकचे काका मारोतराव वानखडे हे मौजा तिवसाघाट वाई बु. शेतशिवारातील शेतामध्ये भाजीपाला काढण्याकरीता गेले होते. त्यांनी शेतातील विहीरीमध्ये डोकावून बघितले असता त्याना ऋतीक हा विहीरीतील पाण्यात पडलेला दिसला. त्यांनी ऋतिक बाबत कुटुंबीय व नातेवाईकांना माहिती दिली. ऋतीक हा घरच्या शेतातील विहीरीतील पाण्यात बुडुन मरण पावलेला दिसत आहे अशी माहीती दिली. त्यानंतर ऋतिकच्या नातेवाईक व मित्र परिवारांनी घटनास्थळी धाव घेतली.

पोलिसांना माहिती देण्यात आली. पोलिसांनी घटनास्थळाचा पंचनामा करून मृतदेह शवविच्छेदनाकरिता ग्रामीण रुग्णालय वरुड येथे रवाना केला. ऋतिकने आत्महत्या का केली? याबाबत वृत्ती लिहिस्तोवर माहिती मिळू शकले नाही. या प्रकरणी पोलिसांनी आकस्मिक मृत्यूची नोंद केली असून पुढील तपास सुरू आहे.

### यंदा महाराष्ट्रात १९ टक्के कमी पाऊस : हवामान खात्याची माहिती

■ (प्रतिनीधी वरुड दर्पण)

**मुंबई** – या मान्सून हंगामात, १ जून ते ३० सप्टेंबर दरम्यान, महाराष्ट्रात सरासरीच्या १९ टक्के कमी पाऊस झाला आहे. राज्यातील वेगवेगळ्या भागांपैकी दुष्काळग्रस्त मराठवाडा हा सर्वाधिक कोरडा राहिला असून तिथे सरासरीपेक्षा ४० टक्के कमी पाऊस झाला आहे; आता कोणत्याही अतिरिक्त पावसामुळे ही तूट कमी होण्याची शक्यता अत्यंत कमी आहे, कारण हवामान विभागाने ३ ते ८ ऑक्टोबर दरम्यान महाराष्ट्रातून मान्सून माघार घेत असल्याची घोषणा होण्याची शक्यता वर्तवली आहे.

# दुष्काळाची झळ! महाराष्ट्रासह १८ राज्यांचा रेड झोनमध्ये समावेश



### * परतीचा मान्सून महाराष्ट्र्राची तहान भागवणार?

■ (प्रतिनीधी वरुड दर्पण)

**नागपूर** – मान्सूनचा परतीचा प्रवास सुरु झाला आहे. परतीच्या मान्सूनने पंजाब, हरियाणा व राजस्थानचा काही भाग ओलांडला आहे. तर महाराष्ट्रातून हा परतीचा मान्सूनचा प्रवास ५ ते १० ऑक्टोबरच्या दरम्यान होणार आहे. अशातच, बहुतांश वेळा परतीचा मान्सून महाराष्ट्र्रात पाऊस देऊन जातो. मात्र सध्या भारतावर प्रतिचक्रवाद स्थिती तयार झाली आहे. जी ढगांना एकत्र येऊ देत नाही. त्यामुळे परतीचा मान्सून महाराष्ट्रात पाऊस देण्याची शक्यता नसल्याचे नागपूर वेध शाळेने सांगितले आहे. परिणामी महाराष्ट्राच्या आणि विशेषतः शेतकऱ्यांच्या वाट्याला निराशाच देणारा असल्याचे बोललं जात आहे. त्यामुळे एकीकडे महाराष्ट्र दुष्काळाच्या झळा सोसत असताना आगामी काळ अधिक अडचणींचा ठरणार असल्याची शक्यता आता अधिक वाढली आहे. सध्या देशात ओडिसा हे एकमेव राज्य आहे, जेथे सरासरी पेक्षा जास्त पाऊस झाला आहे. तर महाराष्ट्रासह १८ राज्य असे आहे जेथे २० टक्क्यापेक्षा जास्त पावसाची तूट असल्याचे आकडेवारीनुसार समोर आलं आहे. परिणामी या १८ राज्यांना रेड झोनमध्ये टाकण्यात आले आहे. तिकडे पश्चिम विदर्भात तर परिस्थिती आणखी बिकट आहे. अकोला आणि अमरावती जिल्ह्यात पावसाची तूट हि ४० टक्क्यापेक्षा अधिकवर पोहचली आहे. महाराष्ट्रातील बहुतांश भागात पाऊसच झाला नाही. सरासरीपेक्षा कमी पावसाची नोंद झाली आहे. पावसाचे चारही महिने कोरडेच गेले आहेत. दीड महिने तर राज्यातील अनेक भागात पावसाचा एक थेंबही पडला नाही.










